❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २३५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

# शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर टपरीमुक्त असावा : मुख्यमंत्री



■ मुंबई (दै. संध्या)

तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा तरुणांना नशेच्या गर्तेत ढकलणाऱ्या प्रवृत्तींना प्रतिबंधित करावे. तरुणांच्या समस्या लक्षात घेऊन त्यांना सहानुभूतीने या दुष्टचक्रात जाण्यापासून रोखावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी नशा मुक्त महाराष्ट्र धोरण सादरीकरणाबाबत आयोजित बैठकीत दिले.

नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणांचा दृष्टिकोन महत्वाचा ठरणार आहे. सर्व संबंधित विभागांनी आपली जबाबदारी ओळखून प्रभावी भूमिका बजाविल्यास पुढील काळात निश्चितच नशामुक्त महाराष्ट्र घडविता येईल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. बैठकीला गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते. नशेच्या दुष्टचक्रात अडकलेल्या तरुणांना यामधून बाहेर पडण्यासाठी प्रत्येक शासकीय रुग्णालयांमध्ये नशा मुक्ती केंद्र स्थापन करण्याच्या सूचना देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये नशामुक्ती केंद्र कार्यान्वित करावीत. राज्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या नशामुक्ती केंद्रांचे सक्षमीकरण करण्यात यावे. यासाठी आवश्यकता असल्यास निधीची तरतूद करण्यात यावी. या केंद्रांच्या माध्यमातून नशामुक्तीचे प्रभावी कार्यान्वयन होण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली विकसित करावी. नशामुक्त झालेली तरुणाई पुन्हा नशेच्या गर्तेत जाऊ नये, यासाठी नशा मुक्ती केंद्रांच्या साखळीसोबतच त्यास कारणीभूत ठरत असलेल्या घटकांवर नियंत्रण आणावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर हा टपरीमुक्त असावा. याबाबत कुठलीही तडजोड करता कामा नये. सर्व शैक्षणिक संस्थांचा परिसर हा अमली पदार्थ मुक्त असावा. संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी शैक्षणिक आस्थापनेचा कॅम्पस अमली पदार्थ मुक्त घोषित करण्याची कार्यवाही करावी. शालेय शिक्षणात अमली पदार्थांचे दुष्परिणाम यावर आधारित अभ्यासक्रम समावेशाची कार्यवाही पूर्ण करावी. अमली पदार्थ विषयक गुन्ह्यांमध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट) सारख्या कायद्यांचा प्रभावी उपयोग करीत गतीने निकालाची कार्यवाही पूर्ण होण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करावी. यासोबतच अशा गुन्हांच्या निपटाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर विशेष सरकारी अभियंत्यांच्या पॅनलची व्यवस्था करावी. हे पॅनल राज्य शासनाच्या अधिकारांतर्गत नियुक्त करण्याची तरतूद असावी.

## महाराष्ट्रात अमली पदार्थांच्या विरोधातील कारवाई

२०२३ मध्ये एनडीपीएस (नार्कोटिक ड्रग्ज अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस ॲक्ट) अंतर्गत ८९७ कोटी रुपये किमतीचे ४३ हजार ६३२ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले आहे. तर २०२५ मध्ये जप्तीच्या कारवाई मध्ये २०२३ च्या तुलनेत २९ टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे. यावर्षी ५६ हजार २०६ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले. त्याची किंमत १ हजार ३४० कोटी रुपये किंमत आहे. किमतीच्या दृष्टिकोनातून ४९ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

नशामुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्यासाठी संपूर्ण शासकीय यंत्रणेचा सर्वसमावेशक दृष्टिकोन असणे गरजेचे आहे. यासाठी सकारात्मक दृष्टिकोन ठेवत अमली पदार्थांशी निगडित संपूर्ण परिसंस्थेवर नियंत्रण आणावे.

समाजामध्ये अंमली पदार्थ विषयी जनजागृती करण्यासाठी जगातील यशस्वी पद्धतींचा अभ्यास करीत प्रभावी संदेश प्रणाली विकसित करावी. नशेच्या दुष्टचक्रात चुकीने आलेल्या तरुणांना कुठेही गुन्हेगार असल्याची मानसिकता तयार होऊ देऊ नये. त्यांना नशामुक्ती केंद्राच्या माध्यमातून त्यांना सकारात्मक आयुष्याचा अनुभव द्यावा. नैसर्गिक अमली पदार्थ उत्पादन करीत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिला.

तरुणांमध्ये नशा करण्याची लक्षणे आढळल्यास त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अमली पदार्थविरोधी कारवाईमध्ये जिल्हास्तरीय समित्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. या समित्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यात यावे. त्यांच्या कामगिरीच्या आधारावर जिल्ह्याची रँकिंग पद्धत विकसित करावी. तसेच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय 'एन कॉर्ड ' शिखर समितीची स्थापना करण्यात यावी, असेही निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

बैठकीत अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरण केले. बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे, अपर मुख्य सचिव (परिवहन) संजय सेठी, प्रधान सचिव अनुपकुमार सिंग, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, माहिती व जनसंपर्कचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, अमली पदार्थ विरोधी कृती दलाचे विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योती प्रिया सिंग, अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे आदी उपस्थित होते.

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### पंतप्रधान यांचा अभिमान वाटतो : युगेंद्र पवार

बारामती : दैनिक संध्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ भाजपचे नेते नाहीत, ते देशाचे पंतप्रधान आहेत. त्यामुळे मलाही त्यांचा अभिमान वाटतो. कामासाठी कोणालाही भेटणे गैर नाही. सत्तेत असणाऱ्यांना भेटून कामे मार्गी लावावी लागतात. विरोधक म्हणजे शत्रू नसतो. त्यांनी एकमेकांचे गळे धरायचे का? राजकारण असे नसते, असे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवानेते आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार यांनी सांगितले. एका खासगी कार्यक्रमानिमित्त बारामतीत त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. आमचा पक्ष भाजपसोबत जाणार का? हे आता ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाच विचारले पाहिजे. पण, मला वाटत नाही की, आम्ही भाजपसोबत जाऊ, असेही पवार यांनी सांगितले. ते म्हणाले की, १६ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामती दौऱ्यावर येत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व भाजप यांच्या समीकरणाची चर्चा रंगू लागली आहे. यावर युगेंद्र म्हणाले की, सुप्रिया सुळे यांच्या कन्या रेवती यांच्या विवाहाच्या स्वागत समारंभात मी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. एखाद्या कार्यक्रमात पंतप्रधानांची भेट झाली म्हणजे आपण त्यांच्या संपर्कात आहोत किंवा त्यावरून राजकीय समीकरणे जोडणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### विद्यार्थिनीची पदवी कायम : सर्वोच्च दिलासा

नवी दिल्ली : दैनिक संध्या

अनुसूचित जमातीचे (एसटी) जात प्रमाणपत्र रद्द झाले असले, तरी संबंधित विद्यार्थिनीने संपूर्ण अभ्यासक्रमादरम्यान खुल्या प्रवर्गाचे शुल्क भरले असल्याने तिचे रोखून ठेवलेले निकाल जाहीर करून पदवी प्रमाणपत्र देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यामुळे विद्यार्थिनीला तिच्या फार्मसीच्या पदवीबाबत मोठा दिलासा मिळाला आहे. या प्रकरणातील मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती मनमोहन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. मात्र, पदवी मिळण्याचा लाभ हा भविष्यातील आरक्षणाच्या हक्काशी जोडला जाणार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. २०१४-१५ मध्ये संबंधित विद्यार्थिनीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात एसटी प्रवर्गातून फार्मसी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला होता. मात्र, महाविद्यालयाने ती खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र असल्याचे स्पष्ट केल्यानंतर विद्यार्थिनीने खुल्या प्रवर्गाचे संपूर्ण शुल्क भरले. तिने २०१८ मध्ये आपले शिक्षण पूर्ण केले.

### चिमुकल्याची सुटका

बोरी : दैनिक संध्या

जिंतूर तालुक्यातील कौसडी शिवारातील गट क्रमांक २५ मध्ये बुधवारी (दि. १९) दुपारी तीन वर्षीय चिमुकला बंद बोअरवेलमध्ये पडल्याने एकच खळबळ उडाली. सुमारे १५ फूट खोल बोअरवेलमध्ये अडकलेल्या या बालकाला बाहेर काढण्यासाठी ग्रामस्थांसह महसूल, पोलीस, आरोग्य विभाग आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने तातडीने बचावकार्य सुरू केले. तब्बल दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर दुपारी ३.३२ वाजता चिमुकल्याला सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णवाहिकेतून जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# विद्यार्थ्यांनी सामाजिक कार्यात सक्रिय व्हावे

■ मुंबई (दै. संध्या)

विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग विधायक कामांसाठी करत सामाजिक जाणीव जोपासावी. समाजाच्या गरजा आणि स्वतःची आवड, क्षमता ओळखून सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा. असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि वैयक्तिक अडचणी जाणून घेतल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीमुळे होणारे फायदे, तसेच त्यांना येणाऱ्या अडचणी याबाबत सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सकारात्मक प्रतिसाद देत त्यांच्या सूचनांवरही चर्चा करण्यात आली. मंत्री पाटील म्हणाले, विद्यार्थीदशा ही व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात समाजासाठी काम करण्याची वृत्ती महत्त्वाची असते. विद्यार्थ्यांनी वेळेचा सदुपयोग करून ज्ञान, कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच सामाजिक कार्यात सहभागी व्हावे. मुलींना उच्च शिक्षण घेताना आर्थिक मदत आणि आत्मविश्वासपूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांना दरमहा दोन हजार रुपये पॉकेट मनी उपलब्ध करून देण्याबाबत विद्यापीठ, महाविद्यालये आणि शिक्षण विभागाचे संयुक्त प्रयत्न सुरू असल्याचेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले. इतिहासाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या इतिहासाचा केवळ अभ्यास न करता तो जपण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. ऐतिहासिक वारसा, वास्तू आणि सांस्कृतिक ठेवा यांच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकता यावे यासाठी इंटर्नशिपच्या संधी अधिक व्यापक करण्यावरही भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांना मार्गदर्शन आणि संवादाची गरज असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न मोकळेपणाने मांडावेत आणि महाविद्यालयांनीही विद्यार्थ्यांशी नियमित संवाद ठेवावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयांना केले.



■ मंत्री चंद्रकांत(दादा) पाटील

# जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना

### मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा झालेल्या गावांना जलयुक्त शिवार ३.० मध्ये प्राधान्य मिळणार – मुख्यमंत्री

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रातील मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.




वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील. मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. यावेळी मुख्यमंत्र्यांचे जलविषयक सल्लागार श्रीराम वेदिरे यांनी मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत सादरीकरण केले. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंग, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज, आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भारतीय फिरकीसमोर श्रीलंका 'सरेंडर'!

### टीम इंडियाने गॉल कसोटी १६५ धावांनी जिंकली : मानव सुतारने एकाच डावात टिपले ६ बळी

■ मुंबई (दै. संध्या)

भारताने गॉल येथे पहिली कसोटी १६५ धावांनी जिंकली. ३७२ धावांचे लक्ष्य असताना, श्रीलंकेचा दुसरा डाव २०६ धावांवर सर्वबाद झाला. मानव सुतारने सहा बळी घेतले. या विजयासह, भारतीय संघाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरी कसोटी २३ ऑगस्टपासून कोलंबो येथे खेळवली जाईल. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत आपल्या पहिल्या डावात ४६२ धावा केल्या. प्रत्युत्तरात, श्रीलंकेचा पहिला डाव २८४ धावांवर सर्वबाद झाला. दुसऱ्या डावात भारतीय संघाकडे १७८ धावांची आघाडी होती. भारताने आपल्या दुसऱ्या डावात १९३ धावा करत एकूण ३७१ धावांची आघाडी घेतली होती. मानवने सामन्यात एकूण १० बळी घेतले, ज्यात पहिल्या डावातील चार बळींचा समावेश आहे.

चौथ्या दिवशीच्या ४ बाद ८४ या धावसंख्येवरून पुढे खेळताना, श्रीलंकेच्या संघाने आपल्या एकूण धावसंख्येत आणखी १२२ धावांची भर घातली आणि उर्वरित सहा बळी गमावले. कर्णधार धनंजय डी सिल्वा आणि सोनल दिनुशा यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत पाचव्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी केली. धनंजय ५९ धावांवर बाद झाला; त्याच्या या खेळीत सात चौकारांचा समावेश होता. त्यानंतर श्रीलंकेच्या संघाने नियमित अंतराने विकेट्स गमावणे सुरूच ठेवले; निरोशन डिकवेला (१०) आणि केशरा नुवानथा (२०) हे दोघेही बाद झाले.दरम्यान, प्रभात जयसूर्या आणि लाहिरू कुमारा यांना खातेही उघडता आले नाही. सोनल दिनुशा ८४ धावांवर बाद झाला; त्याने आपल्या खेळीत आठ चौकार आणि एक षटकार लगावला. भारतासाठी सुतार व्यतिरिक्त प्रसिद्ध कृष्णाने दोन बळी घेतले, तर रवींद्र जडेजा आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी एक बळी मिळवला.




नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर, भारतीय संघाने पहिल्या डावात ४६२ धावा केल्या; यात पडिक्कलच्या १६७ धावांचा मोलाचा वाटा होता. याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेचा संघ २८४ धावांत सर्वबाद झाला, ज्यामुळे भारताला १७८ धावांची आघाडी मिळाली होती. भारताने दुसऱ्या डावात १९३ धावा केल्या. यामध्ये ऋषभ पंतच्या ६६ आणि पडिक्कलच्या ४४ धावांचा समावेश होता. भारताने श्रीलंकेसमोर विजयासाठी ३७२ धावांचे लक्ष्य ठेवले. पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल आणि उपकर्णधार केएल राहुल यांनी भारताला शानदार सुरुवात करून दिली; यशस्वी ३२ धावांवर धावबाद झाला, तर केएल राहुल (८२) शतकापासून हुकला. साई सुदर्शन दुखापतग्रस्त झाल्यामुळे तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या देवदत्त पडिक्कलने २३० चेंडूंत १६७ धावांची खेळी केली, ज्यामध्ये १५ चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. कर्णधार शुभमन गिलने १६ धावा केल्या आणि ऋषभ पंतने ३९ धावांची खेळी केली. ध्रुव जुरेलने अर्धशतक (५१) झळकावले. रवींद्र जडेजाने १३, मानव सुतारने २४, मोहम्मद सिराजने ११, प्रसिद्ध कृष्णाने २ धावा केल्या, तर कुलदीप यादव १३ धावांवर नाबाद राहिला.



# महानगरपालिकेने प्रस्ताव सादर करावा

■ मुंबई (दै. संध्या)

पुणे जिल्हा परिषदेची निवासस्थाने बांधण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मालकीच्या बिबवेवाडी येथील जागेवरील आरक्षण रद्द करणे आवश्यक आहे. हे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) नुसार पुणे महानगरपालिकेने प्रक्रिया करून नगर विकास विभागाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. पुण्यातील बिबवेवाडी येथील जिल्हा परिषदेच्या भूखंडांवरील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथिगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, नगरविकास विभागाच्या सहसचिव सुलेखा वैजापूरकर उपस्थित होते.

## संपादकीय

# केशवराव भोसले' तिऱ्हाईताच्या ताब्यात?

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कलादृष्टीतून उभे राहिलेले आणि कोल्हापूरच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक असलेले संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणीच्या अंतिम टप्प्यात असतानाच त्याच्या व्यवस्थापनावरून वाद निर्माण झाला आहे. महापालिकेने व्यवस्थापन बाह्य संस्थेकडे सोपविण्याच्या निर्णयामुळे रंगकर्मी, सांस्कृतिक कार्यकर्ते आणि विरोधकांनी सार्वजनिक सांस्कृतिक वारशाच्या जतनाबाबत चिंता व्यक्त केली आहे. कोल्हापुरात श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांच्या कलावारशावरून नव्या वादाला तोंड फुटले आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कलादृष्टीतून साकारलेले आणि कोल्हापूरच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक मानले जाणारे संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह भीषण आगीच्या दुर्घटनेनंतर नव्याने उभे राहत असतानाच त्याच्या व्यवस्थापनावरून संघर्ष निर्माण झाला आहे. नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आले असताना महापालिकेने त्याचे व्यवस्थापन बाह्य संस्थेकडे सोपविण्याचा प्रस्ताव मांडला. २० जुलै रोजी झालेल्या महासभेत हा प्रस्ताव ४३ विरुद्ध २९ मतांनी मंजूर झाला. त्यामुळे 'जनतेच्या पैशातून नाट्यगृहाची पुनर्बांधणी करायची आणि त्यानंतर त्याचे व्यवस्थापन खासगी किंवा बाह्य संस्थेकडे सोपवायचे का?' असा सवाल रंगकर्मी, सांस्कृतिक कार्यकर्ते आणि विरोधी पक्षांकडून उपस्थित केला जात आहे. ८ ऑगस्ट २०२४ रोजी लागलेल्या भीषण आगीत केशवराव भोसले नाट्यगृहाचे मोठे नुकसान झाले. या दुर्घटनेनंतर कोल्हापूरकरांच्या भावना तीव्र झाल्या आणि 'जसे होते तसेच नाट्यगृह पुन्हा उभे करा', अशी मागणी सर्वपक्षीय पातळीवर जोर धरू लागली. या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घटनास्थळी पाहणी करून वर्षभरात नाट्यगृहाची पुनर्बांधणी पूर्ण करण्याची ग्वाही दिली. तसेच, राज्य शासनाने पुनर्बांधणीसाठी २५ कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली. या पुनर्बांधणीसाठी रंगकर्मींना प्रशासनाचा वारंवार पाठपुरावा करावा लागला. कामाला होत असलेल्या विलंबाच्या निषेधार्थ त्यांनी आंदोलने, निवेदने, फेऱ्या तसेच विविध अभिनव मार्गांनी आंदोलन केले. २०२४ मध्येच रंगकर्मींनी नाट्यगृहाच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे व्यावसायिकीकरण होऊ नये, अशी ठाम भूमिका मांडली होती. आता नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीचे काम अंतिम टप्प्यात आले असताना, इस्टेट विभागाने त्याच्या व्यवस्थापनासाठी बाह्य व्यवस्थापक नेमण्याचा प्रस्ताव मांडला आहे. प्रशासनाच्या मते, नाट्यगृहाच्या देखभाल खर्च आणि उत्पन्नामध्ये दरवर्षी सुमारे ५० लाख रुपयांची तफावत असून, बाह्य व्यवस्थापनामुळे कार्यक्षम कारभार, नियमित देखभाल आणि आर्थिक शिस्त राखणे शक्य होईल. मात्र, या प्रस्तावामुळे नाट्यगृहाच्या भाड्यात वाढ होणार का, सामान्य रंगकर्मी आणि सांस्कृतिक संस्थांना ते पूर्वीप्रमाणे उपलब्ध राहणार का, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य कायम राहील का, तसेच नाट्यगृहाचे सार्वजनिक स्वरूप अबाधित राहील का, असे अनेक महत्त्वाचे प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. महासभेतील चर्चेदरम्यान विरोधकांनी याच मुद्द्यावर आक्षेप नोंदवला. नगरसेवक सुनील मोदी यांनी शासनाच्या ६ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या जीआरचा संदर्भ देत संबंधित संस्थेची कायदेशीर नोंदणी, लेखापरीक्षण, पात्रता पडताळणी तसेच सार्वजनिक निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबवण्याची मागणी केली. आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड यांनीही हा प्रस्ताव पुढे नेण्यापूर्वी सर्व कायदेशीर बाबींची सखोल तपासणी केली जाईल, असे स्पष्ट केले. दरम्यान, आगीनंतरच्या चौकशीचा आणि जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न अद्यापही पूर्णपणे निकाली निघालेला नाही. सुरुवातीला एफआयआर दाखल न केल्याबद्दल प्रशासनावर टीका झाली होती. अखेर ३० ऑगस्ट २०२४ रोजी अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## संस्कृत सुभाषित

वैष्णव जन तो तेणे कहिये जो परपीडा जाने रे।

अर्थ : जे अशा उच्च कोटीला पोहोचलेले असतात, त्यांना स्वार्थ उरत नाही. जनाच्या कल्याणासाठीच अशा विभूती अवतरतात. त्यांना मग ती दु:ख निवारणाचीच चिंता उरते.

## गुरु वचन

### वास्तव्याची जाण

एका राज्याचा राजा दररोज सकाळी फेरफटका मारण्यासाठी जात होता. त्याला रस्त्यात जी व्यक्ती पहिल्यांदा दिसेल त्याची तो प्रत्येक इच्छा पूर्ण करायचा.

असेच एका दिवशी निघाला असता त्याला एक ब्राह्मण भेटला. राजाने त्याला विचारले की, ब्राह्मण देवता मी आपली काय मदत करू. ब्राह्मण लाजून म्हणाला, महाराज आपण जे उचित समजाल त्यावर राजा म्हणाला, आपण सांगा काय पाहिजे. ब्राह्मणाच्या मनात लोभ आला. तो राजला म्हणाला, महाराज आपण फिरून या तोपर्यंत मी विचार करतो की, मला काय पाहिजे. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून राजा फिरण्यासाठी गेला. नंतर ब्राह्मणाच्या मनात विचार आला की, अशी संधी पुन्हा-पुन्हा मिळत नाही. एकदाच असे काही तरी मागतो की, पुन्हा कधी काही मागण्याची गरज पडणार नाही. राजा फिरून आला व त्याने ब्राह्मणाला त्याची इच्छा विचारली. तेव्हा ब्राह्मणने राजाला पूर्ण राज्य मागीतले. राजानेही ताबडतोब यासाठी होकार दिला व ब्राह्मणाला म्हणाला, मी तर अनेक दिवसांपासून याची प्रतिक्षा करत होतो की या ओझ्यातून केव्हा मुक्त होईल. आपण येथेच थांबा मी राज्याचा कारभार आपल्याकडे सोपवण्याची व्यवस्था करतो. असे म्हणून राजा महालात जातो. राजाचे म्हणणे ऐकून ब्राह्मण चिंतेत पडतो. त्याला वाटत नव्हते की, राजा एवढ्या सोप्या पद्धतीने राज्य सोपवून देईल. ब्राह्मणाच्या मनात ईश्वरीय भावना जागृत झाली आणि त्याने विचार केला की, वास्तविकतेमध्ये वैरागी तर राजा आहे. मी तर फक्त ढोंग करतो. हा तर मोहापासून दूर आहे. ब्राह्मणाला वास्तव्याची जाण झाली आणि तो तिथून निघून गेला. त्याला आपल्या मोहावर पश्चाताप झाला.

## उपदेशकथा

### स्वार्थ

राजा वीरेंद्रसिंह एकदा शिकारीला निघाले होते. शिकार आणि घोडदौड हे त्यांच्या आवडीचे विषय होते. नेहमीप्रमाणे लवाजमा घेऊन वीरेंद्रसिंह जंगलच्या रस्त्याला लागले. गाव मागे पडले अन् जंगलाचा रस्ता सुरू झाला. राजाने पाहिलं तर समोर एक वृद्ध गृहस्थ कसले तरी रोप लावत होता. राजाला आश्चर्य वाटले. त्याने विचारले, 'म्हातारबा, कसले रोप लावताहात?' म्हातारा म्हणाला, 'राजा, आरं मी बदामाचं झाड लावतोया.' राजा म्हणाला, 'ते खरं म्हातारबा, पण त्याचा तुम्हाला काय उपयोग? हे झाड वाढणार कधी अन् त्याला बदाम लागणार कधी? कदाचित तुम्ही तेव्हा असणारही नाही. कशाला एवढे कष्ट घेत आहात?' म्हातारा शांतपणे म्हणाला, "ते मला कळतंया रं! पण स्वत:च्या पोटापुरतं पाहणारा मनुष्य नीच असतो. मला फळं मिळाली नाहीत तर काय झालं? कुणाला तरी मिळतीलच ना!"

कथा उपदेश : स्वार्थी माणूस स्वत:चाच विचार करतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| २० ऑगस्ट २०२६ | योग:ऐन्द्र २८:२४:३८+ |
| गुरुवार | करण:विष्टि ०८:१६:०५ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:बव २१:१८:३९ |
| श्रावण शके | सूर्य:सिंह |
| संवत्- १९४८ | चन्द्र:वृश्चिक०२:२९:५४ |
| संवत्सर - पराभवनाम | हिजरी सन् - १४४८ |
| अयन- दक्षिणायण | मुस्लिम मास - रबिलावल |
| मास- श्रावण | तारीख - ६ |
| ऋतु - सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | दुर्गाष्टमी |
| तिथि:अष्टमी २१:१८:३९ | दर्वाष्टमी |
| नक्षत्र:विशाखा | बृहस्पती पूजन |
| ०९:०७:५२ | खोरदाद साल |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | | 6 | | 2 | | 8 |
| 8 | | | 1 | 7 | | 9 | | 4 |
| | | | | 4 | | | 7 | 5 |
| 6 | | | 7 | | 3 | | 2 | |
| | | 3 | 5 | | 6 | 4 | | |
| | 5 | | 2 | | 4 | | | 6 |
| 5 | 1 | | | 2 | | | | |
| 3 | | 6 | | 5 | 8 | | | 1 |
| 4 | | 7 | | 3 | | 6 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०४४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 2 | 7 | 5 | 6 | 4 | 8 | 1 | 3 |
| 8 | 6 | 3 | 1 | 2 | 9 | 5 | 4 | 7 |
| 5 | 4 | 1 | 7 | 3 | 8 | 6 | 2 | 9 |
| 7 | 1 | 4 | 2 | 8 | 3 | 9 | 5 | 6 |
| 2 | 3 | 5 | 6 | 9 | 1 | 7 | 8 | 4 |
| 6 | 9 | 8 | 4 | 5 | 7 | 2 | 3 | 1 |
| 4 | 8 | 6 | 9 | 1 | 2 | 3 | 7 | 5 |
| 3 | 7 | 9 | 8 | 4 | 5 | 1 | 6 | 2 |
| 1 | 5 | 2 | 3 | 7 | 6 | 4 | 9 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८५६ - कंडेन्स्ड मिल्क तयार करण्याच्या प्रक्रियेचा शोध.
- १८९७ - रोनाल्ड रॉस यांनी हिवतापाचा प्रसार ॲनोफिलस डासां मार्फत होतो, हे सिद्ध केले.
- १९६८ - रशियन सैन्य झेकोस्लोव्हाकियात शिरले.

### आंतरराष्ट्रीय

- २००६ - कोलंबोत भारतीय नेमबाजांनी १० व्या दक्षिण आशियाई क्रीडा स्पर्धेत २५ मीटर पिस्तूल नेमबाजीत २ सुवर्ण जिंकले.

### राष्ट्रीय

- १९७९ - इंदिरा गांधींनी पाठिंबा काढून घेतल्याने चरणसिंग सरकार कोसळले.
- २००३ - तेलगीप्रकरणी सीबीआयने नाशिकच्या छापखान्यावर (सिक्युरिटी प्रेस) छापा घातला.
- २००३ - आसाममध्ये बिहारींविरुद्ध दंगलीत ५० ठार.

### जन्म

- १७७९ - थॉमस बझेलियस, रसायनशास्त्रातील मूलद्रव्यांच्या लघुरूप संज्ञा मांडण्याचा परिपाठ सुरू करणाऱ्या.
- १८१८ - एमिली ब्रॅंट, 'वुदरिंग हाइट्स'ची लेखिका.
- १८७१ - चक्रधरस्वामी, महानुभाव पंथाचे संस्थापक.
- १९४४ - राजीव गांधी, इंदिरा गांधींचे सुपुत्र, भारताचे माजी पंतप्रधान.

### निधन

- १६३९ - फॉन वोबरफेल्ट मार्टिन ओपित्झ, जर्मन कवी आणि समीक्षक.
- १७६७ - विठ्ठल शिवदेव, पेशवाईतील शूर पुरुष.
- १९१२ - जनरल विल्यम बूथ, साल्व्हेशन आर्मीची स्थापना करणाऱ्या.
- १९८४ - 'रघुवीर', महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार.

## : SMS :

Husband-WifeWife: Suno ji, aaj khane me kya banaun?
Husband: Jo bhi banao, bas bill mat bhejna

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.३ | २३.४ |
| अहमदनगर | ३१.२ | २१.९ |
| अकोला | ३३.६ | २३.३ |
| अमरावती | ३३.३ | २३.७ |
| बीड | ३५.६ | २४.४ |
| भंडारा | ३१.७ | २४.८ |
| बुलढाणा | ४३.४ | २६.९ |
| चंद्रपूर | ३६ | २४.८ |
| चेन्नई | ४०.८ | २८.९ |
| नवी दिल्ली | ४२.६ | ३३.८ |
| धुळे | ३४.९ | २४.६ |
| गोंदिया | २७.६ | २४.४ |
| जळगाव | ३१.६ | २३.२ |
| कोल्हापूर | २६.३ | २१.२ |
| लातूर | ३१.१ | २२.३ |
| मुंबई | ३४.५ | ३१.१ |
| नागपूर | ३३.४ | २३.६ |
| नांदेड | ३२.९ | २३.७ |
| नंदूरबार | ३०.७ | २४.९ |
| नाशिक | २९.९ | २२ |
| पुणे | २६.५ | २२ |
| पंढरपूर | ३२.७ | २४.८ |
| सातारा | ३० | २०.२ |
| सांगली | २९.३ | २१.८ |
| सोलापूर | ३३.४ | २४.४ |
| वर्धा | ३४ | २४.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार-मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**कर्क :** तरीही जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची अध्यात्मिक प्रगती होईल. आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**तुळ :** हाताखालील कर्मचाऱ्यांचे उत्तम सहकार्य लाभेल. काहींची अध्यात्मिक प्रवृत्ती वाढीस लागेल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.


**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**मीन :** नोकरी-व्यवसायात उत्तम महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४५



### आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.)
५. तडीपार
७. बहुदा उसने बळ
९. जुगाराचा एक प्रकार
१०. अमावस्या
११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग
१२. गंध
१४. नजरकैद, अटक
१६. योग्य, बरोबर
१८. संताप
१९. रूक्ष, कोरडे
२२. सेवक
२३. मृत्यू नसलेला
२४. बातमी
२५. उत्तरदायित्त्व, जोखीम
२७. किरकोळ सामान
३०. भार, बोजा
३१. शेवटचा पांडव
३३. गाडीचे छत
३५. विजार
३६. वरपांगी
३८. वटवट, त्रास
३९. पदर
४१. दरवाजा
४२. आरोप
४३. सवय, उत्तर दिशा
४४. देवाण-घेवाण
४८. आस, अक्ष
४९. बडबड्या
५०. प्रेत
५२. निवासस्थान
५३. सर्वांना सारखे प्रमाण
५५. रेचक
५६. वागणूक
५७. किंमत
५८. नवीन आलेला
६०. लहानच्या विरुद्ध
६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६२. दिवसभराचे एकूण काम
६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला?
६६. भांडण
६७. मस्ती, जोम
६८. पोते शिवण्याची जाड सुई
६९. खोदकाम
७१. पोपट
७३. सैन्याचा दाणागोटा
७४. वाळवी, उणीव
७५. अनौपचारिक सहभोजन

### उभे शब्द

१. रम्य
२. बाजार
३. बंगाली रुपाया
४. घर सोडून निघून जाणे
५. मावळ्यांची युद्धातील घोषणा
६. मर्यादा
७. स्थिती, दशा
८. वस्त्र, कापड
११. मध्यम प्रमाण
१३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का'
१५. सह, सोबत
१७. थापा मारणारा
२०. आवाजातील घोगरेणा
२१. सज्ज
२२. मोठा भाऊ
२४. धडपड, प्रयत्न
२५. आजूबाजूला
२६. पावाचा गोल प्रकार
२८. धडक
२९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा
३१. संतोष आनंद
३२. आशीर्वाद
३४. अंदाज, तर्क
३७. नवरदेव, ४०. चटकन
४२. सजावट
४४. अवडंबर, धैर्य
४५. उंबरठा
४६. सचिव, मुख्य
४७. किंमत
४८. अंब्याचे मिष्टान्न
४९. चणचण, न्यूनता
५१. मुलगा किंवा मुलगी
५३. चांगली वागणूक
५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ.
५५. धनको
५९. मरेपर्यंत
६०. मोजणी
६१. हास्याचे पीक
६३. सुसर
६४. उत्सव
६५. फुलातील पुंकेसर
७०. पुरुष
७२. वैताग (ला.)

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४४ चे उत्तर

आडवे उत्तर : १.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दरामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

उभे उत्तर : १.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८. माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ससून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचा अमनोरा येस फाउंडेशनतर्फे सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

ससून रुग्णालयात रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. या सेवेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या 'मावशी' आणि 'दाई' यांचा सन्मान होणे अत्यंत योग्य आहे, असे प्रतिपादन बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी केले. अमनोरा येस फाउंडेशन (सिटी ग्रुप) यांच्या वतीने ससून रुग्णालयातील मावशी व दाईंना स्व. मीरा देशपांडे सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी डॉ. पवार बोलत होते. कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लाप्पा जाधव, सिटी ग्रुपचे मुख्य सामाजिक अधिकारी विवेक कुलकर्णी, तसेच बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. या पुरस्काराचे स्वरूप ₹११,००० रोख रक्कम, साडी, शाल व सन्मानचिन्ह असे होते. ससून रुग्णालयातील श्रीमती गंगुबाई धोंडीबा दळवी, श्रीमती रुमिला रवी शिंदे, श्रीमती शैला सुरेश सैद, श्रीमती सुनीता रविंद्र कांबळे, श्रीमती गौरी रविंद्र गोहीरे आणि श्रीमती सुनीता कैलास गायकवाड यांचा त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात ससून नर्सिंग कॉलेजमधील गुणवंत विद्यार्थिनी प्राची बाळू चव्हाण, सिमरन सुरेंद्र मोरे, सय्यद इस्मिया जावेद आणि प्रतीक्षा जाधव यांना मीरा देशपांडे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. शिष्यवृत्तीचे स्वरूप प्रमाणपत्र व ₹१५,००० असे आहे. अमनोरा येस फाउंडेशनच्या माध्यमातून रूरल गर्ल्स अकादमी हा उपक्रमही राबविला जात आहे. या उपक्रमातून आतापर्यंत चार विद्यार्थिनी क्लास-वन अधिकारी, डॉक्टर आणि इंजिनियर झाल्या आहेत. दरवर्षी सुमारे ४० विद्यार्थिनींना मीरा देशपांडे शिष्यवृत्ती दिली जाते. आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात अमनोरा येस फाउंडेशन सातत्याने विविध उपक्रम राबवत असून, वंचित व ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्यासाठी संस्थेचे कार्य सुरू आहे.





'छात्रों की गुंज' छापलेला टी शर्ट कार्यक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणार आहे. या टी शर्टचे अनावरण आज काँग्रेस भवन येथे करण्यात आले. यावेळी माजी मंत्री यशोमती ठाकूर, राजस्थानच्या माजी मंत्री रेहाना चिस्ती, प्रभारी बी. एम. संदिप, माजी मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील, पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या पश्चिम विभागाच्या अध्यक्षा दीप्ती चवधरी, पूर्व विभागाचे अध्यक्ष प्रशांत जगताप, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष रमेश बागवे, मोहन जोशी, के. बी. बैजु, मनोज त्यागी, प्रवक्ते अतुल लोंढे, गोपाळ तिवारी, सरचिटणीस अमिर शेख, महाराष्ट्र युवक काँगेस अध्यक्ष शिवराज मोरे, नगरसेवक रफिक शेख आदी.

## थोडक्यात पण महत्वाचे

### कुपोषणाच्या जोखमीतील मुलांमध्ये वाढ

पुणे : दैनिक संध्या

जागतिक हेल्थकेअर लीडर ॲबॉटने रँडमाइज्ड कंट्रोल्ड ट्रायलचे निष्कर्ष जाहीर केले ज्यामध्ये दिसून आले की भारतातील कुपोषणाच्या जोखमीतील मुलांना डायटरी काउन्सेलिंगसोबत ओरल न्यूट्रिशन सप्लिमेंट दिल्यास वाढीचे परिणाम लक्षणीयरीत्या सुधारले. सप्लिमेंट घेतलेल्या गटातील मुलांची उंची सहा महिन्यांत सुमारे 2.4 पट जास्त वाढली आणि लीन मास जवळपास 15% अधिक वाढला, जे फक्त डायटरी काउन्सेलिंग घेणाऱ्या मुलांपेक्षा जास्त होते. हा ट्रायल चिल्ड्रेन अँड जर्नल आणि क्लिनिकल मेडिसिन या जर्नल्समध्ये प्रकाशित झाला असून यात सुमारे 3 ते 7 वर्षे वयोगटातील 223 भारतीय मुलांचा समावेश होता. या मुलांना खाण्याबाबत चोखंदळ सवयी होत्या आणि ते कुपोषित किंवा कुपोषणाच्या जोखमीतील होते. सहा महिन्यांच्या कालावधीत या अभ्यासातील कुटुंबांना आणि मुलांना डायटरी काउन्सेलिंग देण्यात आले, ज्यामध्ये सुमारे अर्ध्या मुलांना दररोज दोन वेळा ॲबॉटचे PediaSure हे पेडियाट्रिक ओरल न्यूट्रिशन सप्लिमेंट दिले गेले. संशोधकांनी ठरवलेल्या कालावधीत वाढ, आहार सेवन, शरीराची रचना (बॉडी कॉम्पोझिशन) आणि इतर आरोग्य निर्देशकांचे मूल्यांकन केले. बॉडी कॉम्पोझिशन आणि हाडांचे आरोग्य ड्युअल-एनर्जी एक्स-रे ॲब्सॉर्प्शियोमेट्री (DXA) या गोल्ड-स्टँडर्ड इमेजिंग-आधारित मोजमाप तंत्रज्ञानाद्वारे तपासण्यात आले. या तंत्रामुळे लीन मास, फॅट मास आणि बोन मिनरलायझेशनचे अचूक मोजमाप करता येते.

### एनसीपीए आणि नॅशनल थिएटर यूके तर्फे कनेक्शन्स इंडियाचा विस्तार

पुणे : दैनिक संध्या

नॅशनल सेंटर फॉर द परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए) आणि नॅशनल थिएटर यूके यांनी 'कनेक्शन्स इंडिया'च्या चौथ्या आवृत्तीची घोषणा केली. प्रथमच मुंबईबाहेर विस्तार करत हा उपक्रम मुंबई, दिल्ली, बेंगळुरू आणि पुणे या चार शहरांमध्ये होणार आहे. यंदा ३३ शाळा, महाविद्यालये आणि स्वयंसेवी संस्थांमधील विद्यार्थी भारत आणि ब्रिटनमधील नामांकित नाटककारांची १० समकालीन नाटके सादर करतील. मैत्री, ओळख, मानसिक आरोग्य, हवामान बदल आणि सहनशीलता यांसारख्या विषयांचा नाटकांमध्ये समावेश आहे. व्यावसायिक दिग्दर्शक व कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना अभिनयासह नेपथ्य, वेशभूषा, मंच व्यवस्थापन आणि तांत्रिक निर्मितीचा अनुभव मिळणार आहे. चार शहरांतील सादरीकरणांनंतर जानेवारी २०२७ मध्ये राष्ट्रीय महोत्सव होईल. गेल्या तीन आवृत्त्यांमध्ये ३४ संस्था आणि ५५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यंदाच्या विस्तारामुळे देशभरातील अधिक तरुणांना दर्जेदार नाट्यशिक्षण आणि व्यावसायिक रंगभूमीचा अनुभव मिळणार आहे.

### बजाज फिनसर्व्ह फ्लेक्सी कॅप फंडाला 3 वर्षे पूर्ण; १८.२१% सीएजीआर परतावा

पुणे : दैनिक संध्या

बजाज फिनसर्व्ह म्युच्युअल फंडाने आज आपल्या प्रमुख योजनेचा, बजाज फिनसर्व्ह फ्लेक्सी कॅप फंडाचा, तिसरा वर्धापन दिन साजरा केला. ही ओपन-एंडेड इक्विटी योजना मेगाट्रेंड्स-आधारित गुंतवणूक धोरणानुसार लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप कंपन्यांमध्ये गुंतवणूक करते. १४ ऑगस्ट २०२३ रोजी सुरू झाल्यापासून, फंडाच्या डायरेक्ट प्लॅन–ग्रोथ पर्यायाने १८.२१% सीएजीआर परतावा दिला आहे. त्याच कालावधीत फंडाच्या बेंचमार्क बीएसइ 500 टीआरआय ने १२.७४% सीएजीआर परतावा दिला. म्हणजेच १३ ऑगस्ट २०२६ रोजी फंडाने बेंचमार्कपेक्षा ५.४७ टक्के गुणांनी सरस कामगिरी केली. याच कालावधीत रेग्युलर प्लॅन–ग्रोथ पर्यायाने १६.५९% सीएजीआर परतावा दिला आहे. १४ ऑगस्ट २०२३ ते १३ ऑगस्ट २०२६ या संपूर्ण बाजारचक्रादरम्यान, डायरेक्ट प्लॅन–ग्रोथ पर्यायाने ६५.२% निरपेक्ष परतावा दिला, तर बीएसइ 500 टीआरआय ने ४३.३% परतावा दिला. याच कालावधीत रेग्युलर प्लॅन–ग्रोथ पर्यायाने ५८.५% परतावा दिला. १३ ऑगस्ट २०२६ रोजी, सुरुवातीला डायरेक्ट प्लॅनमध्ये रू. १०,००० ची केलेली गुंतवणूक वाढून रू. १६,५१३ झाली असती. त्या तुलनेत बीएसइ 500 टीआरआय मध्ये हीच गुंतवणूक रू. १४,३२५ आणि योजनेच्या अतिरिक्त बेंचमार्क निफ्टी 50 टीआरआय मध्ये रू. 13,003 झाली असती. त्याचप्रमाणे, रेग्युलर प्लॅन–ग्रोथ पर्यायातील रू. १०,००० ची समतुल्य गुंतवणूक रू. १ ५,८४३ झाली असती. फंडाने जोखीम-समायोजित कामगिरीचे अनुकूल स्वरूप दाखवले आहे.

### सत्ता-पक्षांचे विरोधक, हे राष्ट्र द्रोही नव्हे तर राष्ट्र-हितैषी : काँग्रेस

पुणे : दैनिक संध्या

जगात 'भारत ही लोकशाहीची जननी (India is the Mother of Democracy)' चा डंका पिटणारे भाजप'चे शिर्ष नेतृत्व किती दुट्टपी, स्वार्थी व ढोंगी आहे हे पंतप्रधानांनी स्वत:च सिद्ध केले असून, "देशात स्वबुद्धीचा वापर करून, देशातील विद्यार्थी व तरूणांच्या भवितव्याचा व त्याद्वारे देश हिताचा" विचार करणारे राजकीय नेते, सिव्हिल सोसा. सदस्य वा लोकशाही जीवंत असल्याचे अस्तित्व दर्शवणाऱ्या सभमाजिक चळवळींचे घटक' ज्यांना नको आहेत, त्याच पंतप्रधान मोदींनी या सर्वांची 'दिमागी नक्सल' म्हणून निर्भत्सना केली, हा 'लाल किल्या वरून लोकशाहीवर केलेला आघात' असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस'चे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी प्रसिद्धी निवेदनाद्वारे केले. ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान पदाची गरिमा घालवणारे, 'एवढे बुद्धीशत्रू' ही असतील असे वाटले नव्हते. देशात केवळ निवडणूकजीवी राजकारण करत, स्वायत्त संस्थांचा दुरुपयोग करत सर्वत्र 'सत्ता प्राप्ती' नंतरही, देशाच्या विद्यार्थी, तरूणांच्या, शेतकऱ्यांच्या वा छोट्या उद्योजकांच्या हितार्थ, लोकाभिमुख सत्ता राबवली जात नसल्यानेच लोकशाही'ला अभिप्रेत 'विविध स्तरावर' आवाज उठवला जात आहे .

# 'भाटा'तून उलगडणार स्वप्नांसाठीच्या संघर्षाची कहाणी

■ "भाटा" चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर लॉंच : २८ ऑगस्ट रोजी चित्रपट सर्वत्र प्रदर्शित

■ पुणे (दै. संध्या)




पारंपरिक समाजरचनेत प्रत्येक समाजघटकाच्या कामाचे स्वरुप निश्चित केलेले होते. मात्र, बदलत्या काळानुसार ही परिस्थिति बदलत गेली आणि नवी पिढी नवी स्वप्ने पाहू लागली. बेलदार समाजातील नव्या पिढीची गोष्ट भाटा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आला आहे.उत्कृष्ट स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २८ ऑगस्ट रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे.

व्ही. डि. एंटरटेनमेंट आणि मोरया उद्योग समूह यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली असून अरायव्हल स्टुडिओ प्रा. लि. या निर्मिती संस्थेने "भाटा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सुनील आबा जाधव आणि विजय चंद्रकांत चव्हाण हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. रिजवान शेख, मितेश पराडकर, सुनील कातकर हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. भरतराज नारायण यादव यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा विजय चंद्रकांत चव्हाण यांची आहे, तर पटकथा आणि संवाद शरद कारंडे यांचे आहेत. श्रेयस आंगणे यांनी चित्रपटाची गाणी लिहिली असून संगीतही त्यांचेच आहे तर छायाचित्रण हरेश सावंत यांचे आहे. .सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, अभिनेते अरुण नलावडे, प्रशांत मोहिते अभिनेत्री रुपाली जाधव, विजय कदम, अनिल नगरकर, लक्ष्मण देवभट, प्रेमा किरण बालकलाकार तनिष्का जाधव यांचा दमदार अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे. पिढ्यानपिढ्या दगड फोडत जगणाऱ्या बेलदार समाजातील एक बाप आपल्या मुलांच्या आयुष्याला नवी दिशा देण्याचं स्वप्न पाहतो. गरिबी, परिस्थिती आणि समाजाच्या पारंपरिक विचारांविरोधात उभा राहून आपल्या मुलांना शिक्षण आणि चांगलं भविष्य देण्यासाठी संघर्ष करणाऱ्या बापाची गोष्ट भाटा या चित्रपटात मांडण्यात आला आहे. शिक्षण, नव्या पिढीची स्वप्ने, प्रथा-परंपरा या माध्यमातून एक वेगळा अनुभव देण्याचा प्रयत्न दिग्दर्शकानं केला आहे. उत्तम स्टारकास्ट असलेल्या या चित्रपटाचा टीजर उत्सुकता वाढवणारा आहे.

# एमएचटी-सीईटीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'ट्रायम्फ सिरीज'चे अद्ययावत रूप

■ पुणे (दै. संध्या)

एमएचटी-सीईटी २०२७ परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी टार्गेट लर्निंग व्हेंचर्सने आपल्या 'एमएचटी-सीईटी ट्रायम्फ सिरीज'चे अद्ययावत रूप बाजारात आणले आहे. या नव्या आवृत्तीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच समाविष्ट करण्यात आलेली 'चाप्टर लेन्स' ही संकल्पना. या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्येक पाठाचे परीक्षेतील महत्त्व समजून घेऊन अधिक नियोजनबद्ध पद्धतीने अभ्यास करता येणार आहे. 'चाप्टर लेन्स'च्या माध्यमातून २०२१ ते २०२६ या कालावधीत एमएचटी-सीईटी परीक्षेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे उपविषयानुसार विश्लेषण करण्यात आले आहे. कोणत्या घटकावर किती प्रश्न विचारले गेले, एखादा प्रश्न किंवा घटक परीक्षेत किती वेळा आला आणि कोणत्या भागाला अधिक महत्त्व आहे, याची सांख्यिकीय माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटकांना प्राधान्य देऊन अभ्यासाचे नियोजन करणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे. याशिवाय 'डिड यू नो?' या सदरामध्ये अभ्यासातील संकल्पनांशी संबंधित वास्तविक जीवनातील रंजक माहिती देण्यात आली आहे. या नव्या मालिकेत २६ हजार १०० हून अधिक बहुपर्यायी प्रश्नांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांच्या आकलन आणि विचारक्षमतेनुसार प्रश्नांचे तीन स्तर करण्यात आले आहेत. 'क्लासिकल'मध्ये थेट आणि ज्ञानाधारित प्रश्न, 'क्रिटिकल'मध्ये तार्किक विचार व उपयोजन कौशल्य तपासणारे प्रश्न, तर 'क्रॉसओव्हर'मध्ये विविध संकल्पनांचा एकत्रित वापर करणारे प्रश्न देण्यात आले आहेत.




# टाटा प्लेकडून चार महिन्यांच्या मोफत ऑफरसह सबस्क्रायबर्ससाठी स्पॉटीफाय प्रीमियम सादर

■ पुणे (दै. संध्या)




टाटा प्ले या भारतातील अग्रगण्य कंटेंट डिस्ट्रिब्युशन प्लॅटफॉर्मने स्पॉटीफायसोबत सहयोगाने नवीन ऑफर सादर केली आहे, ज्यामुळे सबस्क्रायबर्सना जगातील सर्वात लोकप्रिय ऑडिओ स्ट्रीमिंग सेवेचा आनंद घेता येईल. ही ऑफर आजपासून टाटा प्ले बिंज सबस्क्रायबर्ससाठी उपलब्ध होईल आणि त्यानंतर टाटा प्ले मोबाईल ॲपवर देखील टप्प्याटप्प्याने उपलब्ध केली जाईल. आपल्या संगीत पर्यायांचा विस्तार करून, टाटा प्ले सबस्क्रायबर्सना अधिक पर्याय उपलब्ध करून देत आहे आणि त्याचबरोबर आपल्या सध्याच्या टेलिव्हिजन व ओटीटी ॲग्रीगेशन सेवांना पूरक ठरत आहे. या ऑफरचा भाग म्हणून, स्पॉटीफाय प्रीमियमवरील नवीन सबस्क्रायबर्स स्पॉटीफाय प्रीमियम स्टँडर्डच्या चार महिन्यांच्या मोफत ट्रायलचा आनंद घेऊ शकतात. या लॉंचबाबत मत व्यक्त करत टाटा प्लेच्या चीफ कमर्शियल अँड कंटेंट ऑफिसर पल्लवी पुरी म्हणाल्या, "हा सहयोग टाटा प्लेची घरोघरी असलेली अधिक पोहोच आणि स्पॉटीफायचा जागतिक दर्जाचा ऑडिओ प्लॅटफॉर्म यांना एकत्र आणून ग्राहकांसाठी अधिक मूल्य निर्माण करतो.

# संविधानाचा अवमान करणाऱ्यांच्या निषेधार्थ २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन

■ पुणे (दै. संध्या)

भारतीय संविधान आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा अवमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तीच्या विरोधात पुणे शहर, जिल्ह्यातील सर्वपक्षीय संविधानवादी नागरिकांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष कुणाल राजगुरू, विठ्ठल गायकवाड, माजी नगरसेविका लता राजगुरू, संग्राम रोहम आदि मान्यवर उपस्थित होते.

देशाच्या घटनात्मक सर्वोच्च पदावर असलेले वरिष्ठ संसदीय सभागृहाचे सदस्य व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तसेच काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे ८ ऑगस्ट २०२६ रोजी विजय शंखनाद रॅलीच्या कार्यक्रमासाठी उत्तराखंड मधील हलदानी येथील रामलीला मैदानावर उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर जातीयवादी प्रवृत्तीच्या काही लोकांनी गोमूत्र शिंपडून मैदान पवित्र केल्याचा दावा केला आहे, ही कृती म्हणजे केवळ मल्लिकार्जुन खर्गे यांचाच नव्हे तर भारतीय संविधानाचा अवमान असल्याचे समितीने म्हटले आहे. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत डॉ. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.




# युनायटेड वे बेंगळुरूचा महाराष्ट्रातील सहा वर्षांचा प्रवास

■ पुणे (दै. संध्या)

पाणी सुरक्षा, जलसंधारण, पर्यावरण संवर्धन, शिक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि उपजीविका या विविध क्षेत्रांत काम करत युनायटेड वे बेंगळुरूने गेल्या सहा वर्षांत ग्रामीण महाराष्ट्रातील जवळपास ९० हजार नागरिकांपर्यंत पोहोच साधली आहे. २०२०-२१ पासून सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषद, पुणे आणि विविध सामाजिक उत्तरदायित्व भागीदारांच्या सहकार्याने ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकल्प राबविण्यात आले. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गजानन पाटील यांच्या निमंत्रणावरून जिल्हा परिषद कार्यालयात सामाजिक उत्तरदायित्व विषयक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. शिक्षण, उपजीविका, जलसंवर्धन आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील उपक्रमांना सातत्यपूर्ण सहकार्य केल्याबद्दल सुमारे १२ उद्योगसमूहांच्या प्रतिनिधींचा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. घरांच्या छतांवर पावसाचे पाणी साठविण्यापासून तसेच सामुदायिक जलस्रोतांच्या विकासापासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा विस्तार १८ जलसंधारण संरचनांच्या बळकटीकरणापर्यंत झाला आहे. यासोबतच पर्यावरणीय पुनर्स्थापना आणि वृक्षलागवडीचे उपक्रमही राबविण्यात आले. या भागीदारीतून आठ अंगणवाडी केंद्रे आणि दहा शाळांना सहकार्य करण्यात आले असून, मुलांसाठी तसेच स्थानिक समुदायांसाठी अधिक सक्षम शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.




# भावाचा आणि वाचवण्यासाठी धावलेल्या भावाचा विजेचा धक्का लागून मृत्यू

■ पुणे (दै. संध्या)

राहू गावा नजीक असलेल्या सोनवणेमळा येथे घरातील कपडे वाळत घालण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या तारेच्या वलणीला विद्युत प्रवाह उतरल्याने ओम नितीन भोईटे (वय १८)आणि रोहित अनिल भोईटे (वय २१) या सख्ख्या चुलत भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. घटना बुधवार (दि.१९) रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे.घटनेमुळे सोनवणे मळ्यासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत घटनेची खबर शिवराज लक्ष्मण नवले (रा.राहू) यांनी यवत पोलीस ठाण्यात दिली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार सोनवणेमळा येथील अनिल भोईटे यांच्या घरात सकाळी सातच्या सुमारास ओम भोईटे हा कपडे काढण्यासाठी लोखंडी तारेच्या वलणीजवळ गेला होता. त्यावेळी वलणीला अचानक विद्युत प्रवाह उतरल्याने त्याला विजेचा जोरदार धक्का बसला. भावाला विजेचा धक्का बसल्याचे लक्षात येताच त्याचा भाऊ रोहित याने मदतीसाठी धाव घेतली. मात्र त्यालाही विद्युत प्रवाहाचा धक्का बसला. दरम्यान या कालावधीत मुलांना विजेचा धक्का बसल्याचे पाहून आई सोनाली नितीन भोईटे यांनी देखील मदतीसाठी धाव घेतली होती. त्यांनाही विजेचा धक्का लागला होता परंतु स्थानिक युवक शिवराज नवले यांनी प्रसंगावधान राखून मोठ्या धाडसाने सुती पोत्याच्या सहाय्याने तार तोडण्याचा प्रयत्न केला.

# राहुल गांधींच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील नामांकित महिलांचा पाठिंबा

■ पुणे (दै. संध्या)



विरोधी पक्षनेते राहुल गांधी येत्या दि. २२ रोजी पुण्यात येत आहेत. 'छात्रों की गुंज' या अभियानांतर्गत पुण्यातील विद्यार्थीनींशी ते शैक्षणिक, रोजगार, सुरक्षा, पेपर फुटी संदर्भात चर्चा करणार आहेत. या कार्यक्रमाला चित्रपट निर्मात्या, दिग्दर्शक शिल्पा बल्लाळ, अभिनेत्री प्राजक्ता हनमघर, विधितज्ञ रमा सरोदे, लेखिका ऐश्वर्या रेवाडकर, वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. पल्लवी माळी लडकत यांनी पाठिंबा दिला आहे. राजकीय प्रक्रियेत विद्यार्थ्यांना थेट संवाद असणं महत्वाच आहे. राहुल गांधी सामान्य लोकांत मिसळून त्यांचे प्रश्न समजून घेत आहेत हे स्वागतार्ह आहे. एक नागरिक म्हणून आम्ही त्यांना पाठिंबा देत आहोत, असे प्रतिपादन शिल्पा बल्लाळ यांनी केले. मी भूमिका साकारणारी अभिनेत्री आहे पण त्याहून अधिक भूमिका घेणारी नागरिक आहे. सावित्री, जिजाऊ, रमाई, पंडिता रमाबाई, मुक्ता जावळे, फातिमा शेख यांच्या पुण्यात राहुल गांधी मुलींच्या प्रश्नांवर बोलायला, त्यांचे अश्रू पुसायला येत आहेत. त्यांच्या सोबत एक कलाकार म्हणून मी आहे, असे मत अभिनेत्री प्राजक्ता हणमघर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील महिला मुलींचे गायब होण्याचे प्रमाण वाढले आहे. महिला - मुलींवरील अत्याचारात महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. महिलांची सुरक्षा आणि त्यांचे भविष्य यावर भाष्य करण्यासाठी राहुल गांधी पुण्यात येत आहेत, ही स्वागतार्ह गोष्ट आहे, असे प्रतिपादन ॲड. रमा सरोदे यांनी केले.

बंद पडत असलेल्या सरकारी शाळांमुळे मुलींच्या शिक्षणावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. बहुजन समाजाच्या मुलींचे शैक्षणिक भविष्य सरकारी शाळांवर आणि तेथील पायाभूत सोई सुविधांवर अवलंबून आहे. खा. राहुल गांधी यांनी यावर भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा स्त्रीवादी लेखिका ऐश्वर्या रेवाडकर यांनी मांडली.

# दोस्तीकॉन २०२६ राष्ट्रीय डायबेसिटी परिषद नागपुरमध्ये देशभरातील तज्ज्ञ एकत्र येणार

■ नागपूर (दै. संध्या)



मधुमेह, लठ्ठपणा आणि त्यातून होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांचे प्रमाण वाढत असताना दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव्ह) तर्फे दोस्तीकॉन 2026– राष्ट्रीय डायबेसिटी परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. ही परिषद 22 आणि 23 ऑगस्ट 2026 रोजी हॉटेल रेजेंटा सेंट्रल, जगनाडे चौक, नागपूर येथे होणार आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदची थीम "गुडबाय डायबेसिटी, गुडबाय डायबेटिक फूट" म्हणजेच "डायबेसिटीला निरोप, डायबेटिक फूटला निरोप" अशी आहे. देशभरातील डॉक्टर, वैद्यकीय तज्ज्ञ आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ या परिषदेत सहभागी होणार आहेत. मधुमेह, लठ्ठपणा, डायबेटिक फूट (मधुमेहामुळे पायांवर होणाऱ्या गंभीर समस्या) आणि चयापचयाशी संबंधित आरोग्य समस्यांवरील आधुनिक उपचार पद्धती आणि नवीन माहितीवर यावेळी चर्चा होणार आहे. या परिषदेचे आयोजन दोस्ती (डायबिटीज ओबेसिटी सोसायटी ट्रान्सफॉर्मेशन इनिशिएटिव) यांच्या वतीने करण्यात येत आहे. या आयोजनाला इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया (API), इंडियन पोडियाट्री असोसिएशन, अजमेरू डायबिटीज सोसायटी आणि डायबेटिक असोसिएशन ऑफ इंडिया यांचे सहकार्य लाभले आहे. यासोबतच इंटरनॅशनल डायबिटीज एक्सपर्ट्स कन्सोर्टियम (IDEC), पुणे हे देखील या आयोजनाला सहकार्य करत आहे. आयोजन समितीमध्ये डॉ. अजय कडूसकर, आयोजन सह-अध्यक्ष, दोस्तीकॉन 2026; डॉ. अभिषेक पांडे, आयोजन सह-अध्यक्ष; आणि डॉ. केदार देशपांडे, आयोजन सचिव, दोस्तीकॉन 2026 यांचा समावेश आहे.

दोस्तीचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि दोस्तीकॉन 2026 च्या आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. राजेश देशमुख यांनी सांगितले की, या परिषदेत डायबेसिटी आणि त्यातून होणाऱ्या गुंतागुंतींबाबत सविस्तर माहिती देण्यावर भर दिला जाणार आहे. डॉक्टर आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांसाठी ही परिषद आपले ज्ञान, उपचारांचा अनुभव आणि नवीन उपचार पद्धती एकमेकांसोबत शेअर करण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. मधुमेह आणि लठ्ठपणाकडे वेगवेगळ्या समस्या म्हणून पाहता येणार नाही. या दोन्ही समस्या एकमेकांशी संबंधित मेटाबॉलिक आरोग्याच्या समस्या असून त्यासाठी वेळेवर निदान, योग्य वैद्यकीय उपचार, जीवनशैलीत आवश्यक आणि दीर्घकाळ टिकणारे बदल आणि रुग्णांनी उपचार नियमितपणे घेणे गरजेचे आहे. दोस्तीकॉन 2026च्या माध्यमातून तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर आणणे हा आमचा उद्देश आहे. यामुळे ते वैज्ञानिक माहिती आणि उपचारांच्या व्यावहारिक पद्धती एकमेकांसोबत शेअर करू शकतील. याचा फायदा रुग्णांच्या उपचारांच्या चांगल्या परिणामांसाठी होऊ शकतो. तसेच डायबेसिटी आणि डायबेटिक फूटच्या समस्या टाळण्यासाठी आणि त्यावरील उपचार अधिक प्रभावी करण्यासाठीही मदत होईल. असे डॉ. राजेश देशमुख यांनी सांगितले. मधुमेह हा दीर्घकाळ राहणारा आजार आहे. या आजारात रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त राहते. यामध्ये टाइप-2 मधुमेह हा सर्वात सामान्य प्रकार आहे. आनुवंशिकता, चुकीची जीवनशैली, व्यायामाचा अभाव, आहाराच्या चुकीच्या सवयी, वाढते वय आणि कुटुंबातील मधुमेहाचा इतिहास यांसारख्या अनेक कारणांमुळे मधुमेह होण्याचा धोका वाढतो. विशेष म्हणजे, जास्त वजन नसलेल्या व्यक्तींनाही मधुमेह होऊ शकतो. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी आणि मधुमेहाचे वेळेवर निदान करणे महत्त्वाचे आहे.

# कोकणासाठी कृषी विभागाची प्रशासकीय यंत्रणा बळकट करा

■ चिपळूण (दै. संध्या)



कोकणातील भौगोलिक परिस्थिती, शेतकऱ्यांची संख्या आणि शेतीशी संबंधित योजनांचा वाढता व्याप लक्षात घेऊन कृषी विभागाची क्षेत्रीय यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे सांगत चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाची प्रशासकीय पुनर्रचना प्रस्तावित करण्यात आली आहे. या पुनर्रचनेत उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालये तसेच मंडळ कृषी अधिकारी कार्यालये बंद करण्याचा विचार असल्यास त्याचा थेट परिणाम ग्रामीण भागातील शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कोकणातील भौगोलिक परिस्थितीचा स्वतंत्रपणे विचार करून ही कार्यालये कायम ठेवावीत, अशी मागणी आमदार निकम यांनी केली.

शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामांसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ, पीक पाहणी, तांत्रिक मार्गदर्शन, नैसर्गिक आपत्तीच्या काळातील तातडीची कार्यवाही आणि कृषी विभागाशी संबंधित इतर कामांसाठी क्षेत्रीय कार्यालये महत्त्वाची आहेत. ही कार्यालये बंद झाल्यास दुर्गम भागातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच तांत्रिक मार्गदर्शनासाठी अधिक अंतराचा प्रवास करावा लागू शकतो. कोकणातील डोंगराळ व विखुरलेल्या भौगोलिक रचनेमुळे या निर्णयाचा परिणाम अधिक तीव्र होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# लोहगाव उपजिल्हा रुग्णालय तातडीने सुरू करा

## पुणे जिल्ह्यातील प्रलंबित आरोग्यविषयक कामांना गती द्या : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

■ मुंबई (दै. संध्या)



पुणे जिल्ह्यातील लोहगाव उपजिल्हा रुग्णालय नागरिकांच्या सेवेत तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या, मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांची पूर्तता करून उर्वरित कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज दिले. ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या जवळच्या परिसरात दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांवरील कार्यवाहीला गती देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली लोहगाव उपजिल्हा रुग्णालयासह पुणे जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या विविध विषयांबाबत बैठक झाली. यावेळी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार सुनील टिंगरे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती जितेंद्र बडेकर, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेच्या सदस्या मोनिका हरगुडे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

लोहगाव उपजिल्हा रुग्णालय हे परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचे असून, ते लवकरात लवकर कार्यान्वित होणे आवश्यक आहे. रुग्णालय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या व बाबींची पूर्तता करावी. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करताना बांधकाम व इतर सुविधा दर्जेदार असतील, याची दक्षता घ्यावी. रुग्णालय प्रत्यक्ष नागरिकांच्या सेवेत येण्यासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यातील दुर्गम तसेच औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या भागांमध्ये आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. राजगड (वेल्हे) येथील नवीन ग्रामीण रुग्णालयासाठी नवीन इमारत व आवश्यक पदे मंजूर करण्याची कार्यवाही करावी, चाकण उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण करून आवश्यक पदनिर्मिती करावी, तसेच महाळुंगे (ता. खेड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एमआयडीसीची जागा जिल्हा परिषदेकडे तातडीने वर्ग करावी, असे निर्देश त्यांनी दिले. खेड तालुक्यातील आंबेठाण येथे मोठ्या प्रमाणावर असलेले औद्योगिक क्षेत्र लक्षात घेता तेथे आरोग्य उपकेंद्रास तातडीने मंजुरी देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.


## पंचायत समिती हवेली

### जाहीर बी- 1 निविदा सूचना क्र 1/ 2026-27

पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे यांचे वतीने गटविकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली यांचे तर्फे खालील कामाचे नावा समोर नमूद केल्याप्रमाणे पुणे जिल्हा परिषदेकडील योग्य त्या कंत्राटदाराकडून खालील नमूद कामांच्या सीलबंद निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना उप अभियंता ग्रा.पा.पु हवेली निविदा शाखा यांच्या कार्यालयातून दिनांक- 20/08/2026 ते दिनांक- 01/09/2026 पर्यंत (सुट्टीचे दिवस सोडून) सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत देणेत येतील.सीलबंद निविदा भरलेल्या निविदा पंचायत समिती हवेली ता. हवेली जि. पुणे येथे दिनांक 02 /09/2026 रोजी दुपारी- 3.00 वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. शक्य झाल्यास त्याच दिवशी किंवा त्यानंतर कार्यालयीन सोईच्या दिवशी सक्षम समिती समोर उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम रु. | निविदा फॉर्म फी | इसारा रक्कम रु. | एकूण अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | आवश्यक कंत्राटदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रा.पं. उरुळीकांचन – उरुळीकांचन ग्रा.प. वार्ड क्र. 2 येथे बंदिस्त गटार करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 10,587/- | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 2 | ग्रा.पं कोलवडी साष्टे - कोलवडी साष्टे ग्रा.प. अंतर्गत (संस्कृती आंगण लेन 5 व 6 अरुण जाधव ते समवीर रजपूत) गटर लाईन करणे | 4,23,712/- (GST वगळुन) | 590/- | 4,237/- | 10,593/- | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 3 | ग्रा.पं आव्हाळवाडी - आव्हाळवाडी ग्रा प येथील नळ पाणी पुरवठा वितरण व्यवस्था करणे | 4,23,629/- (GST वगळुन) | 590/- | 4,237/- | 10,591/- | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 4 | ग्रा.पं पेरणे - पेरणे अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 4,23,669/- (GST वगळुन) | 590/- | 4,237/- | 10,592/- | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 5 | ग्रा.पं वाडेबोल्हाई - वाडेबोल्हाई अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 2,11,849/- (GST वगळुन) | 590/- | 2,119/- | 5,297/- | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 6 | ग्रा.पं. गाऊडदरा - गाऊडदरा येथे गावातंर्गत बंदिस्त गटर करणे | 4,22,182/- (GST वगळुन) | 590/- | 4,222/- | 10,555/ | 03 महिने | सुशिक्षित बेरोजगार अभियंता |
| 7 | ग्रा.पं. कदमवाक वस्ती येथे गावातंर्गत ड्रेनिज लाईन करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 10,587/- | 03 महिने | मजुर सहकारी संस्था |
| 8 | ग्रा.पं. वडकी अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामे करणे | 4,23,727/- (GST वगळुन) | 590/- | 4,237/- | 10,593/- | 03 महिने | मजुर सहकारी संस्था |
| 9 | ग्रा.पं वढु खु - वढु खु अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 2,11,807/- (GST वगळुन) | 590/- | 2,118/- | 5,295/- | 03 महिने | मजुर सहकारी संस्था |
| 10 | ग्रा.पं हिंगणगाव –हिंगणगाव ग्रा पं अंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा विहीरीला जाळी बसविणे | 4,17,364/- (GST वगळुन) | 590/- | 4,174/- | 10,434/- | 03 महिने | मजुर सहकारी संस्था |
| 11 | ग्रा.पं. उरुळीकांचन - उरुळीकांचन अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 21,173/- | 03 महिने | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार |
| 12 | ग्रा.पं कुंजीरवाडी - कुंजीरवाडी अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 21,173/- | 03 महिने | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार |
| 13 | ग्रा.पं बकोरी - बकोरी येथे पायाभुत सुविधा अंतर्गत कामे करणे | 4,23,419/- (GST वगळुन) | 590/- | 4,234/- | 21,171/- | 03 महिने | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार |
| 14 | ग्रा प कोरेगाव मुळ कोरेगाव मुळ येथे पायाभुत सुविधा कामे करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 21,173/- | 03 महिने | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार |
| 15 | ग्रा.पं थेऊर – थेऊर अंतर्गत स्वच्छता विषयक कामे करणे | 4,23,466/- (GST वगळुन) | 590/- | 4,235/- | 21,173/- | 03 महिने | पात्र नोंदणीकृत कंत्राटदार |

*निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे*

1) कोऱ्या निविदा संचासाठी अर्जा सोबत उपरोक्त कामांचे नांवा समोर नमूद केल्या प्रमाणे योग्य त्यावर्गाचे नोंदणी प्रमाणपत्र मूळ प्रती दाखविल्या नंतर त्यांना कोरे निविदा संचासाठी भरणा चलन तयार करुन देण्यात येईल.
2) कोऱ्या बी 1 नमुन्याची रक्कम रोख स्वरुपात चलनाने पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा जि.प.पुणे ग.वि.अ. पं.स.हवेली खाते क्र. 029001700023/001 यांचे खात्यावर चलन भरुन दाखविल्यास निविदा उपलब्ध होतील.
3) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 1 मध्ये खालील प्रमाणे कागदपत्राच्या सत्यप्रती सादर कराव्या लागतील.
   अ) जि.प.कडील कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्र
   आ) निविदा फॉर्म फी भरणा चलनाची प्रत
   इ) इसारा रकमेचा पुणे येथे देय होणारा ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने धनाकर्ष डीडी. (D.D.) काढणेत यावा. बयाणा रक्कम सूट प्रमाणपत्र ग्राहय धरले जाणार नाही. तसेच सु.बे.अ. व म.स.स. यांनी ही बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे.
   ई) पॅनकार्ड व जीएसटी प्रमाणपत्र
4) सिलबंद निविदेच्या लिफाफा क्र. 2 मध्ये प्रत्येक पानावर ठेकेदाराचा स्वत:चा सही व शिक्का असलेला तसेच दर अंकी व अक्षरी लिहीलेला व खात्याने साक्षांकित करुन दिलेला निविदा फॉर्म सादर करावा.
5) पात्र निविदाधारकाकडून विहीत सुरक्षा अनामत रक्कमही कामाचा करारनामा करते वेळी गट विकास अधिकारी (नि.श्रे.) पंचायत समिती हवेली जि.पुणे यांचे नावे ठेव पावती स्वरुपात/ चलनाने रोख स्वरुपात घेतली जाईल व उर्वरित अनामत रक्कम प्रथम देयकातून कपात केली जाईल. सु.बे.अ. व म.स.स. कडुन अनामत रक्कमेतून 50% सुट देण्यात आलेली आहे.
6) निविदाधारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 1% पेक्षा कमी असल्यास अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकता नाही.
7) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 1.01 ते 10 % पर्यंत कमी दराचा असेल तर ठेकेदाराने निविदाधीन कामाच्या किमतीच्या 1 % एवढया रकमेचा पुणे येथे देय असलेल्या ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला निविदा प्रसिध्दीच्या दिनांकाच्या तारखेचा धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. निविदादेकार 1% पर्यंत कमी असलेस अतिरिक्त सुरक्षा अनामत भरणेची आवश्यकत नाही. (उदा. 1 ते 10 % पर्यंत कमी दर 1 टक्के रक्कम)
8) निविदा धारकाचा देकार निविदाधीन कामाच्या किमतीपेक्षा 10 % पेक्षा जास्त दराने कमी दराचा असेल तर देकार 10% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील (4) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (उदा. 10% पर्यंत कमीदर 1% व (10% ते 15% कमी दरा प्रति टक्का 1% दराने) 5% असे एकूण 6% रक्कम)
9) निविदा देकार अंदाजपत्रकीय दरापेक्षा 15% पेक्षा कमी असलेस देकार 15% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे त्याच्या दोन पटीन वरील (5) प्रमाणे येणाऱ्या रकमेसह हवेली येथे देय असलेला ग.वि.अ. पं.स. हवेली खाते क्र. 029001700023/001 नावाने काढलेला धनाकर्ष डीडी. (Demand Draft) परफॉर्मंस सिक्यूरिटी म्हणून लिफाफा क्र. 2 मध्ये सादर करावा. (15% पर्यंत कमी एकूण 6%रक्कम व 19% पर्यंत कमीदर (19% -15) 4% * 2 = 8 %) असे एकूण 14% रक्कम सदर डी.डी. सादर केला नसलेस निविदा अवैध ठरविणेत येईल.
10) निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीस मधील सर्व अटी व शर्ती कंत्राटदारावर बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखून ठेवला असून निविदा पाठविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला/ संस्थेला निविदा फेटाळल्या बद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

सही/-
उपअभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग हवेली जि. प. पुणे

सही/-
गट विकास अधिकारी (नि.श्रे.)
पंचायत समिती हवेली जि. पुणे



## जेजुरी नगरपरिषद, जेजुरी

ता. पुरंदर जि. पुणे

संपर्क: ०२११५-२५३१२३ ई-मेल- jn6396@gmail.com

जे.न.पा./जा.क्र./सा.प्र./१९३०/२०२६ दिनांक :- १९/०८/२०२६

**प्रेस नोट**

जेजुरी नगरपरीषदेकडे १) दीपक घोलप यांचे अर्जानुसार राजवाडा चौक येथील नारळाचे धोकादायक झाड काढून टाकण्याची गरज असल्याचे नमूद असून सदर झाड काढून टाकण्याची परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे तरी याद्वारे सदर अर्ज नागरिकांच्या निदर्शनास आणण्यात येत आहे.

शिक्का

सही/-
(श्री. चारुदत्त इंगुले)
मुख्याधिकारी
जेजुरी नगरपरिषद



महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## ई–निविदा सुचना

सासवड विभागातील पुढील कामांसाठी नोंदणीकृत अनुभवी पुरवठादार तसेच ठेकेदार यांचेकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| टि–११/२०२६–२७ | फ्युज वायर पुरविणे | रु. ५.०० लाख |

कोरे निविदा संच महावितरणचे संकेतस्थळावर दि.२०.०८.२०२६ ते दि.२७.०८.२०२६पर्यंत डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध राहिल. सदर निविदा शुल्क ऑनलाईन पद्धतीनेच भरणे आवश्यक आहे. कोणतेही कारण न देता कोणतीही अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकाराने स्वत:कडे राखून ठेवला आहे. अधिक माहतीसाठी व वेळोवेळी होणाऱ्या बदलांसाठी कंपनीचे संकेतस्थळ नियमीत पहावे. https://etender.mahadiscom.in/eatApp/

(पीआरओ/ बीएमटीझेड :१००/२०२६-२७)

कार्यकारी अभियंता,
महावितरण, सासवड विभाग.



प्रपत्र-१

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१

दुरध्वनी क्रमांक ०२०/२५८१७५१७

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- buildingpune.ee@mahapwd.gov.in

ई-निविदा सूचना क्रमांक ६ सन २०२६-२७ (ऑनलाईन)

(संदर्भ- सा. बां. विभाग, शासन निर्णय क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दि. २७/०९/२०१८)

कार्यकारी अभियंता, सा.बां. (इमारती) विभाग, शिवकिर्ती, सदनिका क्र. जी ६/१ व ६/२, घोरपडी रोड, पुणे - ४११००१ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे खालील कामाकरिता बी-१ नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा नमुन्यातील अटीनुसार पात्र/सक्षम असलेले कंत्राटदार/संस्था/कंपनी यांचेकडून मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १ | सहकार भवन शिवाजीनगर, पुणे या इमारतीच्या टप्पा-२ अंतर्गत ५ वा, ६वा व ७ व्या मजल्याचे इमारतीचे वाढीव बांधकाम करणे. | रु. २७.९७ कोटी |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. २१/०८/२०२६ ते दि. ०४/०९/२०२६ |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. ०४/०९/२०२६ वेळ १८.०० पर्यंत |
| निविदापुर्व चर्चा बैठक दिनाक वेळ व पत्ता | दि. ३१/०८/२०२६ वेळ स. १२.०० वाजता (बैठकीचे ठिकाण :- मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक, विभाग पुणे-४११ ००१ मध्यवर्ती इमारत आवार) |
| निविदा उघड्याचा दिनांक व वेळ | दि. ०७/०९/२०२६ वेळ १०.०० पासुन पुढे |

निविदा सूचनेबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

E. www.mahapwd.com (फक्त निविदा सुचना)

२. mahatenders.gov.in

(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, पुणे ४११००१ कार्यालयातील सूचना फलक

जा.क्र. लेखा/निविदा/२१५६/२०२६
कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग, शिवकिर्ती, घोरपडी, पुणे-४११ ००१.
दि. १२/०८/२०२६

सही/-
(उ. सं. घावटे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (इमारती) विभाग,
पुणे ४११ ००१.

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C2373



पिंपरी-चिंचवड आणि परिसर

गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६

दैनिक संध्या



## थोडक्यात पण महत्वाचे



## विकासकामांच्या भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनाला 'अल्टिमेटम'

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी-चिंचवड शहरातील विविध विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या प्रलंबित प्रकरणांना गती देण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी जिल्हा प्रशासनाला स्पष्ट 'अल्टिमेटम' दिला आहे. सादर झालेली भूसंपादनाची प्रकरणे पुढील दीड महिन्यात निकाली काढावीत; अन्यथा येत्या अधिवेशनात संबंधित अधिकाऱ्यांना धारेवर धरले जाईल, असा इशारा आमदार लांडगे यांनी दिला. विशेष म्हणजे, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरसाठी भूसंपादन १०० टक्के होत आहे. त्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे. त्यामुळे पुणे-नाशिक महामार्ग रुंदीकरण प्रकल्पाला गती मिळणार आहे. पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत भूसंपादनासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी नगररचना, जिल्हा प्रशासन, भूसंपादन विभाग, भूमी अभिलेख तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने यापूर्वी सादर केलेल्या विविध भूसंपादन प्रस्तावांचा बैठकीत आढावा घेण्यात आला. यावेळी बैठकीस उपसंचालक, नगररचना विभाग श्री. खोब्रागडे, उपअधीक्षक, भूमी अभिलेख हवेली श्री. गोफणे; नगर भूमापन अधिकारी श्री. ननावरे; कृषी अधिकारी मूल्यांकन श्री. धस; वनाधिकारी श्री. यादव; भूसंपादन अधिकारी गट क्रमांक १ व २ सौ. विश्वासराव; कार्यकारी अभियंता श्री. चौरे, 'फ' क्षेत्रीय कार्यालय; सहाय्यक संचालक, नगररचना श्री. खडतरे; तसेच भूसंपादन समन्वय अधिकारी तथा नायब तहसीलदार श्री. ब्रह्मे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. महापालिकेकडून भूसंपादनाचे प्रस्ताव यापूर्वीच संबंधित विभागाकडे सादर करण्यात आले आहेत. त्यामुळे आता प्रस्ताव कधी सादर करायचा, यापेक्षा सादर झालेल्या प्रत्येक प्रस्तावावर पुढील कार्यवाही कोणत्या विभागाने, कोणत्या अधिकाऱ्याने आणि किती दिवसांत करायची, हे निश्चित करणे आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार लांडगे यांनी मांडली. महापालिकेकडून आवश्यक असलेली अतिरिक्त माहिती किंवा कागदपत्रे मागविण्यात आल्यास ती सात दिवसांच्या आत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच प्रत्येक प्रस्तावासाठी महापालिकेचा नोडल अधिकारी निश्चित करून जिल्हा प्रशासनाशी सातत्याने समन्वय ठेवण्याच्या सूचना करण्यात आल्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील भूसंपादन विभागाने महापालिकेकडून यापूर्वी सादर झालेल्या सर्व प्रस्तावांची प्रकरणनिहाय सद्यस्थिती तयार करावी, कोणत्या प्रकरणावर कोणती कार्यवाही प्रलंबित आहे, याची स्पष्ट यादी महापालिकेला उपलब्ध करून द्यावी, असेही निर्देश देण्यात आले. भूसंपादन प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असलेल्या मोजणीच्या प्रकरणांनाही गती देण्याचे निर्देश देण्यात आले. भूमी अभिलेख व मोजणी कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांची स्वतंत्र नोंद ठेवून आवश्यक मोजणीची कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## खासदार संजय राऊत आणि विनायक राऊत यांच्या हस्ते शुक्रवारी पुरस्काराचे वितरण

पिंपरी : दैनिक संध्या

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी पिंपरी चिंचवड शहर शिवसेनेच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामांकित व्यक्तींचा "उद्धव श्री पुरस्कार" देऊन सन्मान करण्यात येतो. यावर्षीच्या "उद्धव श्री पुरस्कार २०२६" चे वितरण राज्यसभा खासदार संजय राऊत आणि माजी खासदार विनायक राऊत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २१ ऑगस्ट) करण्यात येणार आहे अशी माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पिंपरी चिंचवड शहर प्रमुख चेतन पवार यांनी प्रसिद्धीस दिली आहे. शुक्रवारी (सायंकाळी ४ वाजता), ताथवडे बीआरटी रोड येथील सुखवाणी फार्म, नरसिंह मंदिराजवळ येथे या पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शिवसेना उपनेत्या विशाखाताई राऊत, महाराष्ट्र संघटिका रंजनाताई नेवाळकर, पुणे शहर शिवसेना प्रमुख वसंत मोरे, पुणे शहर माजी प्रमुख संजय मोरे, मावळ तालुका प्रमुख आशिष ठोंबरे, पुणे शहर संपर्क संघटिका मेघना काकडे माने, पिंपरी चिंचवड संपर्क प्रमुख लतिकाताई पाष्टे तसेच गजानन थरकुडे, विजय सुळे, सुनील सावंत आदीं प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. यावर्षीचा "उद्धव श्री पुरस्कार २०२६" डॉ. संतोष लाटकर (वैद्यकीय), डॉ. रोहन काटे (वैद्यकीय), प्रा. तुकाराम पाटील (साहित्यिक), काशिनाथ नखाते (कामगार), प्रीती वैद्य (सामाजिक), चांद पाशा अहमद हुसेन तांबोळी (क्रीडा) पै. योगेश्वर तापकीर (क्रीडा) भाग्यश्री मोरे (सामाजिक), रामदास काटे (कृषी) आणि डॉ. संजीव कुमार पाटील (कला) यांना जाहीर करण्यात आला आहे अशी ही माहिती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पिंपरी चिंचवड शहर प्रमुख चेतन पवार यांनी दिली आहे.

# शिवसेनेच्यावतीने भव्य नोकरी मेळाव्याचे आयोजन - सुलभा उबाळे

## दिव्यांग बांधवांनाही मिळणार रोजगाराच्या संधी - विश्वजीत बारणे

■ पिंपरी (दै. संध्या)

मावळ लोकसभेचे संसद रत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.रविवारी (दि. ३० ऑगस्ट) सकाळी ९ वाजता, चिंचवड गावातील चिंचवडे लॉन्स येथे याचे उद्घाटन होणार आहे अशी माहिती शिवसेना उपनेत्या व ज्येष्ठ नगरसेविका सुलभाताई उबाळे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, समन्वयक किरण राहणे, दीपक पवार आदी उपस्थित होते. या रोजगार मेळाव्यात बँकिंग, आयटी, बीपीओ,



केपीओ, रिअल इस्टेट, मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, टेक्नॉलॉजी यांसह विविध उद्योग क्षेत्रांतील कंपन्या व उद्योग प्रतिनिधी सहभागी होणार आहेत अशी माहिती सुलभा उबाळे यांनी दिली. विश्वजीत बारणे यांनी सांगितले की, या मेळाव्यात ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, हुडास टेक्नॉलॉजी, विगल स्पेस, बजाज, ह्युंदाई, डॉ. रेड्डी फाउंडेशन, बीव्हीजी इंडिया अशा नामांकित आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. अवघ्या पाचवी पास झालेल्या उमेदवारापासून ते आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर, इंजिनिअरिंग तसेच इतर उच्चशिक्षित उमेदवारांपर्यंत सर्वांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, अनुभव आणि कौशल्यांनुसार योग्य रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या मेळाव्यात करण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग बांधवांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या उमेदवारांना मेळाव्याच्या दिवशी थेट नोकरी मिळणार नाही, अशा उमेदवारांना 'खासदार शिवसेना जॉब कार्ड'चे वाटप करण्यात येणार आहे. त्यांची माहिती संकलित करून भविष्यात उपलब्ध होणाऱ्या योग्य रोजगाराच्या संधींबाबत त्यांना मार्गदर्शन करून संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सहभागी उमेदवारांना भविष्यातील रोजगाराच्या संधींशी जोडणारा हा उपक्रम आहे. महिलांसाठीही या मेळाव्यात स्वयंरोजगार, उद्योजकता, कौशल्य विकास व व्यवसायाच्या संधींबाबत मार्गदर्शन आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महिलांना नोकरीसोबतच स्वतःचा व्यवसाय उभारण्याच्या संधींबाबत माहिती देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## मनोज सेठिया यांची शहर अभियंतापदी पदोन्नती

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागातील सह शहर अभियंता (स्थापत्य) मनोज मोतीलाल सेठिया यांना 'शहर अभियंता' पदावर सेवाज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे. याबाबतचा आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जारी केला आहे. महापालिका आस्थापनेवरील 'शहर अभियंता' पद दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रिक्त झाले होते. या पदावरील पदोन्नतीसाठी दिनांक १८ जून २०२६ रोजी पदोन्नती समितीची सभा घेण्यात आली. समितीने शैक्षणिक अर्हता, अनुभव, आरक्षण, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व तसेच शिस्तभंगविषयक बाबींची पडताळणी करून सेठिया यांच्या पदोन्नतीची शिफारस केली. महापालिका सभा ठराव क्र. ४४, दिनांक २७ जानेवारी २०२६ अन्वयेही त्यांच्या पदोन्नतीस मान्यता देण्यात आली आहे. ही पदोन्नती संबंधित न्यायालयीन प्रकरणे, पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित विशेष अनुज्ञा याचिका तसेच



संबंधित शासन निर्णय आणि मुंबई उच्च न्यायालयातील प्रलंबित रिट याचिकांमधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात आली आहे. शहर अभियंता पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शहरातील विकासकामांना तांत्रिकदृष्ट्या अधिक सक्षम दिशा मिळण्यास तसेच स्थापत्यविषयक कामकाजात प्रभावी समन्वय साधण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

## यश मिळाल्यानंतर संस्कार, विवेक आणि नम्रता जपावी

### शास्त्रज्ञ के. व्ही. कोकिळ : एस. बी. पाटील पब्लिक स्कूल येथे स्वातंत्र्यदिन साजरा

■ पिंपरी (दै. संध्या)

फळांनी बहरलेले वृक्ष जसे नम्रतेने झुकतात, त्याप्रमाणे ज्ञान व कर्तृत्व प्राप्त झाल्यानंतरही व्यक्तीने नम्र राहिले पाहिजे. यश मिळाल्यानंतर संस्कार, विवेक आणि नम्रता जपावी असे मार्गदर्शन डीआरडीओ चे शास्त्रज्ञ के. व्ही. कोकिळ यांनी केले.



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूल मध्ये शनिवारी, स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कोकिळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना जोपासत विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्याधिष्ठित शिक्षण आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीत योगदान द्यावे असे प्राचार्या डॉ. बिंदू सैनी सांगितले. यावेळी उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी, सुलोचना पवार, दीपक बल्लाल, क्रांती कुलकर्णी, श्रुती दिवटे, धनाजी पाटील, चंद्रकांत ठिंबरे, रमेश नंदाला, अंकित तांबे, श्रीकांत देशपांडे, प्रिया सूर्यवंशी, गौरी उत्तुरे,अजय चावरिया, सुजाता भोईटे, क्रांती कुलकर्णी, ट्रीझा पीटर्स, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आदी उपस्थित होते. विद्यार्थी रुद्रांश भोंडवे, विदिशा ठाकूर, समृद्धी नायक स्वातंत्र्यदिनाचे महत्व सांगितले. साक्षरता व व्यसनमुक्त भारत सामूहिक प्रतिज्ञा घेतली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रभक्ती गीत सादर केले. नवसाक्षरता अभियानांतर्गत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या निर्मला कांबळे, सुनीता घाडगे, अनिता साबणे आणि स्मिता खुराडे यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले. सूत्र संचालन जुई भोंडवे, पार्थ कुलकर्णी, अनुष्का पाधियार, तनिष्का नेहरे, यांनी केले. स्वर्णिमा कुलकर्णी हिने आभार मानले.

## महापालिका मुख्यालयात डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी तपासणी मोहीम



■ पिंपरी (दै. संध्या)

पावसाळ्यात डेंग्यू, मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य व वैद्यकीय विभागाच्या वतीने महापालिका मुख्यालय परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या वेळी मुख्य इमारतीसह महापालिका आवारातील कूलर, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, पाण्याच्या टाक्या तसेच पाणी साचण्याची शक्यता असलेल्या विविध ठिकाणांची पाहणी करण्यात आली.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम आणि उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. डेंग्यू मलेरिया प्रतिबंधासाठी आजार झाल्यानंतर उपचार करण्यापेक्षा डासांची उत्पत्तीस्थळे वेळीच नष्ट करणे अधिक प्रभावी ठरते. त्यामुळे महापालिका मुख्यालयासह सर्व शासकीय व सार्वजनिक आस्थापनांच्या परिसरात डासांची उत्पत्तीस्थळे निर्माण होणार नाहीत, याची दक्षता घेण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या. तसेच नागरिकांनी घर, कार्यालय आणि परिसरात पाणी साचू न देण्याबरोबरच कूलर, कुंड्या, पाण्याच्या टाक्या आदींची नियमित स्वच्छता करावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. तपासणीदरम्यान कूलरमधील पाणी, कुंड्यांखालील ट्रे, पाण्याच्या टाक्या, वापरात नसलेली भांडी, शोभेच्या झाडांच्या कुंड्या, कार्यालयीन परिसर, वाहनतळ तसेच अन्य ठिकाणी पाणी साचले आहे का, याची पाहणी करण्यात आली. ज्या ठिकाणी पाणी साचलेले आढळून आले, तेथील पाणी तत्काळ काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनची सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

■ पिंपळे सौदागर (दै. संध्या)

पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनची दहावी वार्षिक सर्वसाधारण सभा तसेच दशकपूर्ती स्मरणिका प्रकाशन समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. मंगळवार (दि.१८) रोजी गोविंद गार्डन येथील बासुरी हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास पिंपरी-चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे, नगरसेवक विठ्ठल (नाना) काटे, नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, उद्योजक संजय भिसे, पी. के. इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक जगन्नाथ काटे, पिंपरी-चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ, सामाजिक कार्यकर्ते संदेश काटे तसेच संघटनेचे माजी अध्यक्ष ॲड. शंकरराव पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या दशकभरातील वाटचालीचा आढावा घेतला.

सचिव सखाराम ढाकणे यांनी वार्षिक अहवाल सादर केला, तर कोषाध्यक्ष सुभाष पाटील यांनी संस्थेचा आर्थिक लेखाजोखा मांडला. यावेळी संस्थेच्या दशकपूर्ती स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वार्षिक सभेच्या निमित्ताने ज्येष्ठ कलावंतांनी भजन, अभंग आणि चित्रपट गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

# महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ; मेट्रो प्रवाशांचा पुढील प्रवास होणार सुलभ

### विविध भागातील नागरिकांना मिळणार "घरापासून मेट्रोपर्यंत" आणि "मेट्रोपासून घरापर्यंत" सुलभ, नियमीत व किफायतशीर रिक्षा सेवा

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम,किफायतशीर आणि नागरिकांसाठी सोयीची करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा उपक्रम आहे. मेट्रो आणि रिक्षा सेवा एकमेकांना जोडल्यामुळे नागरिकांचा वेळ वाचणार तर आहेच याशिवाय पार्किंगची समस्या देखील कमी होऊन मेट्रोचा वापर वाढणार आहे. प्रवाशांना सन्मानपूर्वक आणि विश्वासार्ह सेवा मिळणे हीच या उपक्रमाची खरी ओळख ठरणार असून,रिक्षा चालकांनी प्रवाशांचे भाडे नाकारू नये, मीटरप्रमाणे सेवा द्यावी आणि शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी-चिंचवड शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महामेट्रो आणि महाराष्ट्र रिक्षा पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने रिक्षा फिडर सेवेचा शुभारंभ महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.




यावेळी आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रावण हर्डीकर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्य शतृघ्न काटे, तुषार हिंगे, शहर अभियंता मनोज सेठीया,महामेट्रोचे व्यवस्थापक कॅप्टन सनेर पाटील, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह कार्यक्रमाचे संयोजक शुभम तांदळे, विजय ढगारे, विशाल ससाने, धनंजय कुदळे, दीपक ताटे, सुरज सोनवणे, दत्ता गिल्ले, भाऊसाहेब शेलार,रिक्षा चालक आणि विविध प्रवासी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या रिक्षा फिडर सेवेमुळे मेट्रो स्थानकावरून शहरातील विविध भागांमध्ये जाणाऱ्या प्रवाशांना शेअरिंग पद्धतीने रिक्षा सेवा उपलब्ध होणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात विविध मार्गांवर सुमारे २० मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. या मार्गांची, रिक्षा थांब्यांची आणि भाड्याची माहिती देणारे दिशादर्शक फलक मेट्रो स्थानकांवर लावण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांना कोणत्या गेटवरून कोणत्या भागासाठी रिक्षा उपलब्ध आहे, याची माहिती सहज मिळणार आहे.

महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे यांनी रिक्षा चालकांना आवश्यक ती पार्किंगची सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल महापालिकेचे आभार व्यक्त केले, तसेच या उपक्रमातून पुरूष तसेच महिला रिक्षा चालकांना देखील कामाची संधी व रोजगार उपलब्ध होणार असल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. एकूणच भविष्यात मेट्रो, महानगरपालिका आणि रिक्षा सेवा यांच्यातील समन्वयात वाढ होणार असून नागरिकांना "घरापासून मेट्रोपर्यत "आणि "मेट्रोपासून घरापर्यंत" अशा सुलभ, किफायतशीर आणि विश्वासार्ह प्रवासाची सुविधा देण्याच्या दिशेने रिक्षा फिडर सेवा महत्त्वाची ठरणार आहे.

सेवेचे स्वरूप व मार्ग (Routes):-

मेट्रो प्रवाशांच्या सोयीसाठी ही सेवा शेअरिंग आणि मीटर अशा दोन्ही स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

गेट क्र. १: घरकुल प्रकल्प, जाधववाडी, कुदळवाडी, चिखली गाव, अजमेरा कॉलनी, केएसबी चौक, मोरवाडी कोर्ट, शाहुनगर.

गेट क्र. २: अंथिया सोसायटी, अजमेरा कॉलनी, मासुळकर कॉलनी, अंतरिक्ष कॉलनी, खराळवाडी, मोनिका अपार्टमेंट, डी. वाय. पाटील कॉलेज.

गेट क्र. ३: पिंपरी गाव, चिंचवडगाव, तापकीर नगर, वाल्हेकर वाडी, निगडी, डीलक्स चौक, काळेवाडी ब्रिज, साई चौक, चाफेकर चौक.

रिक्षा चालकांसाठी महत्त्वाची नियमावली प्रवाशांना उत्तम सेवा देण्यासाठी मेट्रो स्टेशनवर उपस्थित सर्व रिक्षा चालकांनी प्रवाशांना कोणतेही भाडे नाकारू नये (No Refusal Policy) अन्यथा नियमांचे उल्लंघन करून प्रवाशांना सेवा नाकारणाऱ्या चालकांवर कायदेशीर आणि रिक्षा संघटनेच्या वतीने कारवाई करण्यात येईल असे महाराष्ट्र रिक्षा पंचायतीचे संस्थापक, अध्यक्ष बाबा कांबळे यांनी नमूद केले, या उपक्रमाद्वारे प्रवाशांचा वेळ तर वाचणारच असून, रिक्षाचालकांना हक्काचा आणि सन्मानजनक रोजगार उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. स्मार्ट व नागरिककेंद्रित पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी या उपक्रमास महानगरपालिकेची पूर्ण साथ राहणार आहे.

या सेवेतील महत्त्वाचा निर्णय म्हणजे मेट्रो स्थानकावरून एखाद्या प्रवाशाने मीटरने जाण्याची मागणी केल्यास रिक्षा चालकाने मीटरप्रमाणे सेवा देणे आवश्यक आहे. तसेच प्रवाशाने इच्छित स्थळी जाण्याची मागणी केल्यास त्याचे भाडे नाकारू नये, अशा सूचना रिक्षा चालकांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मेट्रोमधून उतरलेल्या प्रवाशांना पुढील प्रवासासाठी रिक्षा सहज उपलब्ध होणार असून सार्वजनिक वाहतुकीवरील त्यांचा विश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

रिक्षा चालक हा शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाचा घटक आहे. मेट्रो स्थानकापासून नागरिकांना त्यांच्या घरापर्यंत किंवा इच्छित स्थळी पोहोचविण्यात रिक्षा चालकांची भूमिका महत्त्वाची आहे. प्रत्येक प्रवाशाला चांगली सेवा देऊन त्याच्या प्रवासाचा शेवटचा टप्पा सुलभ करण्याचे काम रिक्षा चालकांनी करावे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास शहरातील इतर मेट्रो स्थानकांवरही अशा प्रकारची सेवा आणि रिक्षा थांबे सुरू करण्यासाठी महापालिका प्रयत्न करेल,तसेच रिक्षा स्थानकांवर ई चार्जीगची सुविधा लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहे असेमहापौर रवि लांडगे म्हणाले, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी "मेट्रो सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी मेट्रो स्थानकापासून पुढील प्रवासाची सुविधा उपलब्ध असणे आवश्यक असून मेट्रोमधून उतरल्यानंतर प्रवाशाला सहज रिक्षा मिळाली आणि त्याला इच्छित स्थळी जाता आले, तर मेट्रो आणि रिक्षा या दोन्ही सेवांवरील नागरिकांचा विश्वास वाढेल. रिक्षा चालकांनी भाडे नाकारू नये, मीटरप्रमाणे किंवा निश्चित दराने सेवा द्यावी आणि शेअरिंग पद्धतीचा स्वीकार करावा. यामुळे प्रवासी आणि रिक्षा चालक दोघांनाही फायदा होईल असे सांगितले.

मेट्रो स्थानकापासून नागरिकांना त्यांच्या इच्छित स्थळी जाण्यासाठी चांगली आणि विश्वासार्ह वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते,त्यासाठी हा उपक्रम असून प्रवाशांना चांगली आणि समाधानकारक सेवा मिळणे हे मुख्य उद्दिष्ट आहे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास शहरातील इतर भागांमध्येही या सेवेचा आवश्यक्तेनुसार विस्तार करण्यात येईल असे महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले.

# ‘आरंभ यशाचा प्रारंभबिंदू’ व्याख्यानमालेचे आठवे पुष्प उत्साहात संपन्न

■ बारामती (दै. संध्या)

कृषि उद्योग मूल शिक्षण संस्था, काऱ्हाटी यांच्या वतीने आयोजित ‘आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू’ या प्रेरणादायी व्याख्यानमालेअंतर्गत आठव्या पुष्पाचे आयोजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. मनोज शिवाजी वाबळे, करिअर मार्गदर्शक, प्रेरणादायी वक्ते, कॉर्पोरेट ट्रेनर, लाईफ कोच तसेच अध्यक्ष - शब्दधन सोशल फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांनी “ध्येय स्वप्नांचा, प्रवास कर्तृत्वाचा व कृतज्ञता दादांसाठी” या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आपल्या मार्गदर्शनात प्रा. मनोज वाबळे यांनी विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आवाहन करताना त्या स्वप्नांना ध्येयाची दिशा देऊन सातत्य,



शिस्त, सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर ती साकार करण्याचा संदेश दिला. जीवनात यश मिळवताना आपल्या ध्येयासोबतच समाजाप्रती असलेली बांधिलकी, कृतज्ञता, प्रामाणिकपणा आणि लोकसेवेची भावना जोपासणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी आदरणीय अजितदादा पवार यांच्या कर्तृत्ववान आणि प्रेरणादायी कार्याचा विशेष उल्लेख करत त्यांच्या गुणसंपन्न व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. दादांनी आपल्या कार्यातून विकासाची दूरदृष्टी, शिस्तप्रियता, निर्णयक्षमता, सातत्य, कार्यतत्परता, लोकांशी असलेली आपुलकी, सामाजिक बांधिलकी आणि आपल्या ध्येयाप्रती असलेली निष्ठा यांचा आदर्श समाजासमोर ठेवला असल्याचे त्यांनी सांगितले. “अजितदादांचे कार्य केवळ विकासकामांपुरते मर्यादित नसून, ध्येयासाठी झोकून देऊन काम करण्याची वृत्ती, वेळेचे भान, शिस्त, सातत्य आणि समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देणारे आहे,”असे सांगत विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात शिस्त, कष्ट, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाप्रती संवेदनशीलता या गुणांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांनी केवळ यशस्वी होण्याचे स्वप्न न पाहता चांगला माणूस आणि जबाबदार नागरिक होण्याचेही ध्येय ठेवावे. आपल्या कर्तृत्वातून कुटुंब, संस्था, समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देण्याची भावना प्रत्येक विद्यार्थ्याने मनात रुजवावी, असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. याप्रसंगी शब्दधन सोशल फाउंडेशन यांच्या वतीने कृषि उद्योग मूल शिक्षण संस्थेस ५१ पुस्तके भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीला आणि वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या या पुस्तक भेटीबद्दल संस्थेच्या वतीने शब्दधन सोशल फाउंडेशनचे आभार व्यक्त करण्यात आले. ही व्याख्यानमाला संस्थेच्या अध्यक्षा तथा महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. श्रीम. सुनेत्रा (वहिनीसाहेब) अजितदादा पवार यांच्या प्रेरणेतून व सर्व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्वगुण, करिअरविषयक दृष्टीकोन, जीवनमूल्यांची जपणूक आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण करणे हा या व्याख्यानमालेचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे कार्यकारी अधिकारी श्री. विकास निर्मळ यांनी करून व्याख्यानमालेमागील उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांच्या मनात मोठी स्वप्ने निर्माण करून त्यांना योग्य दिशा, प्रेरणा आणि मार्गदर्शन देणे, तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. माधुरी पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. शितल थोरात यांनी मानले. यावेळी संकुलातील सर्व विभागांचे प्राचार्य, प्राचार्या, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाला उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांना ध्येय, कर्तृत्व, शिस्त, सातत्य आणि समाजाप्रती बांधिलकी यांचा आदर्श घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी वाटचाल करण्याची प्रेरणा देणारे हे व्याख्यान ठरले. ‘प्रेरणेतून दिशा... दिशेतून यश...’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या ‘आरंभ... यशाचा प्रारंभबिंदू’ व्याख्यानमालेचे आठवे पुष्प विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बायोस्टड इंडिया लिमिटेड कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप

हवेली : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील अग्रगण्य असणारी बायोस्टड इंडिया लिमिटेड कंपनी यांच्या वतीने पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव या विद्यालयातील १०वीच्या दहा विद्यार्थ्यांना प्रगती स्कॉलरशीप अंतर्गत तीन हजार रुपये प्रती विद्यार्थी शिष्यवृत्ती प्रदान केली.या वेळी कंपनीचे अधिकारी रामकृष्ण खेमनर ,अमेय आपटे,मुकिंद बाचकर हे उपस्थित होते. या शिष्यवृत्तीचे वाटप नायगाव चे माजी सरपंच सोपानराव चौधरी सुभाष आमले विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, पर्यवेक्षक राजीव चव्हाण व कंपनीचे अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रामकृष्ण खेमनर यांनी सांगितले की तुम्ही चांगल्या पद्धतीने अभ्यास करा,आईवडिलांचे नाव मोठं करा कंपनीतर्फे तुम्हाला शक्य तेवढी मदत केली जाईल.ही मदत रोहिणी म्हेत्रे व दिलीप थोपटे यांनी प्रयत्न केले.तसेच हवेली तालुका विज्ञान मेळाव्यात उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल प्रिया बुवा साहेब सायकर आणि शिक्षिका सौ अस्मिता गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन विठ्ठल ठोंबरे यांनी केले तर सुत्रसंचलन व आभार दिलीप थोपटे यांनी मानले.



### पिंपळवंडीमध्ये चिमुकलीवर अत्याचारानंतर हत्या

नारायणगाव : दैनिक संध्या

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे सुमारे साडेनऊ वर्षाच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी दुपारी घडल्याने संपूर्ण जुन्नर तालुका हादरला आहे. घराशेजारी राहणाऱ्या एका तरुणाने ओळखीचा गैरफायदा घेत मुलीला सायकलवरून ऊसाच्या शेताच्या परिसरात नेल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मंगळवारी दुपारी साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास मुलगी बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबियांनी पोलिसांकडे तिच्या बेपत्ता होण्याची तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत मुलीचा शोध सुरू केला. तपासादरम्यान तिचा मृतदेह आढळून आल्यानंतर घटनेचे गांभीर्य उघडकीस आले. पोलिसांनी संशयित तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याच्याकडे कसून चौकशी सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच पुणे जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी घटनास्थळी भेट देऊन आढावा घेतला. पोलिसांच्याविविध पथकांकडून घटनास्थळाची पाहणी, पुरावे संकलित करणे तसेच घटनेमागील नेमके कारण आणि आरोपीची भूमिका याबाबत तपास सुरू आहे. प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे पोलिसांकडून सांगण्यात आले. या घटनेनंतर पिंपळवंडी परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. चिमुकलीवर अत्याचार करून तिचा जीव घेणाऱ्या आरोपीला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी ग्रामस्थानी केली आहे.

### सतर्कतेमुळे नवजात अर्भकाचे वाचले प्राण

बारामती : दैनिक संध्या

शहरातील तांदूळवाडी येथील जुन्या रेल्वे पुलाखाली नवजात अर्भक टाकून दिल्याची घटना बुधवारी (ता. १९) सकाळी उघडकीस आली. दक्ष नागरिकांनी बारामती तालुका पोलिसांना तत्काळ माहिती दिल्याने पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अर्भकाला ताब्यात घेऊन उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. वेळीच मिळालेल्या मदतीमुळे अर्भकाचे प्राण वाचले असून त्याची प्रकृती सध्या स्थिर आहे. बुधवारी सकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास तांदूळवाडी येथील जुन्या रेल्वे पुलाखाली नवजात अर्भक रडत असल्याची माहिती दक्ष नागरिकांनी पोलिसांना फोनद्वारे दिली.

## ‘त्वचा व आरोग्याची काळजी’ या विषयावर व्याख्यान संपन्न



■ नारायणगाव (दै. संध्या)

लायन्स क्लब ऑफ नारायणगाव आणि ग्रामोन्नती मंडळ नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने "चला महत्त्वाचं बोलू थोडं... त्वचा व तारुण्याच्या उंबरठ्यावर येताना आरोग्याची काळजी" या विशेष मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता 'वसंत व्हिला', गुरुवर्य रा. प. सबनीस विद्यामंदिर, नारायणगाव येथे पार पडला. या कार्यक्रमात तज्ज्ञ व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

डॉ. किरण भांगरे यांनी 'त्वचेची योग्य काळजी कशी घ्यावी' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. ला. डॉ. अनुष्का शिंदे (MD. Hom) यांनी 'तारुण्याच्या उंबरठ्यावर येताना आरोग्याची काळजी व बदल' या विषयावर सखोल माहिती दिली.या कार्यक्रमाचे नियोजन प्रोजेक्ट इनचार्ज ला. विशाल बोऱ्हाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लबचे अध्यक्ष ला. वैभव मुथा, सेक्रेटरी ला. गिरीश मुनोत, खजिनदार ला. हिमांशु शहा, तसेच राजेंद्र देसाई, मनोज भलगत ,योगेश रायकर, विशाल बोऱ्हाडे , संतोष खांडगे, आनद कोठारी यांच्यासह विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा. सौ. मानसी भालेराव आणि उपप्राचार्य मा. श्री. संजय वलटे सर तसेच पोखरकर सर शेटे सर, देशपांडे सर, वामन मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. या व्याख्यानाला विद्यार्थी व शिक्षकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

## बारामतीत जागतिक फोटोग्राफी दिन उत्साहात संपन्न

### नटराज नाट्य कलामंदिरात छायाचित्रकारांची विक्रमी उपस्थिती

■ बारामती (दै. संध्या)

जागतिक फोटोग्राफी दिनानिमित्त बारामती शहर व परिसरातील सर्व फोटोग्राफर बांधवांनी एकत्र येत हा दिवस अत्यंत उत्साहात आणि आनंदात साजरा केला. बारामती फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने येथील नटराज नाट्य कलामंदिर या ठिकाणी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात बारामती परिसरातील तब्बल दीडशेहून अधिक फोटोग्राफर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कॅमेरा पूजनाने सुरुवात: कार्यक्रमाची सुरुवात कॅमेरा पूजन करून करण्यात आली,ज्याद्वारे छायाचित्रण क्षेत्राप्रती आदर व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी परिसरातील ज्येष्ठ (सिनियर) फोटोग्राफर मंडळींनी उपस्थित तरुण आणि नवीन (ज्युनिअर) फोटोग्राफरना छायाचित्रणातील बारकावे, उत्तम कामाच्या पद्धती आणि व्यवसायातील अनुभवाविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक फोटोग्राफर बांधवाचे सचिन सावंत यांच्यातर्फे एक झाड (रोपटं) भेट देऊन अतिशय आगळ्यावेगळ्या आणि पर्यावरणपूरक पद्धतीने स्वागत करण्यात आले. अभिवादन व शपथ: कार्यक्रमादरम्यान सर्व उपस्थितांनी एकमेकांना जागतिक फोटोग्राफी दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. तसेच,फोटोग्राफी क्षेत्रात कायम एकत्रित राहून एकमेकांना सहकार्य करण्याची शपथ घेण्यात आली.यानंतर,माननीय अजित दादा पवार यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून आदरांजली व अभिवादन करण्यात आले. आजच्या या छायाचित्रकार दिनाचे औचित्य साधून, बारामती फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष मल्लिकार्जुन हिरेमठ यांनी आपल्या पदाचा राजीनामा जाहीर केला. तसेच, असोसिएशनचा कारभार अधिक जोमाने चालवण्यासाठी लवकरात लवकर नवीन कार्यकारिणी (बॉडी) स्थापन करण्याची विनंती त्यांनी केली. त्यानुसार,आगामी काही दिवसांमध्येच बारामती फोटोग्राफर असोसिएशनची नवीन कार्यकारणी गठीत केली जाणार आहे. ज्येष्ठ, अनुभवी आणि नवोदित छायाचित्रकारांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा जागतिक फोटोग्राफी दिन बारामतीत अत्यंत यशस्वीपणे व आनंदात पार पडला.

## उपवर्गीकरणासाठी आमदार अमित गोरखेंच्या नेतृत्वाखाली जन आक्रोश महामोर्चे सुरु

■ नारायणगाव (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड येथे आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील मातंग समाजाने उत्तम प्रतिसाद होता. अनुसूचित जातीतील एससी आरक्षणातील उपवर्गीकरणाची मागणी तातडीने मागणी मान्य करण्यासाठी मातंग व समविचारी जनजाती समूहाच्यावतीने भव्य महामोर्चा काढण्यात आला.

या जनअक्रोश महामोर्चाची सुरुवात चिंचवड स्टेशन येथील क्रांतीगुरु लहुजी साळवे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून दु.12.30 वा. या मोर्चाला सुरुवात झाली. यावेळी 35 ते 40 हजार समाज बांधव सहभागी झाले होते. या मोर्चाचे नेतृत्व आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली आमदार सुनील कांबळे, माजी मंत्री दिलीपराव कांबळे, माजी गृहमंत्री रमेश बागवे आणि पुणे शहरातील सर्व आजी-माजी नगरसेवक आणि विविध संघटनांचे पदाधिकारी या महामोर्चात सहभागी झाले



होते. प्रतिनिधीशी बोलताना ,"आळंदी नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष तथा प्रदेश सरचिटणीस भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे अशोकराव उमरगेकर म्हणाले, "महाराष्ट्र शासनाने संविधानाचा आदर करून समता आणि समतेची सर्वांना संधी देण्याचा विचार करावा." "महाराष्ट्रातील मातंग समाज हा संविधानाचा आणि राज्यघटनेचा आदर करणारा समाज आहे!'. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर , आद्यगुरु लहुजी साळवे, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे या सर्व महामानवांच्या विचारांची जोपासना करणारा मातंग समाज आहे.

महाराष्ट्र शासनाने उपवर्गीकरणाची मागणी तातडीने मान्य करावी. अन्यथा महाराष्ट्रातील मातंग समाज आमदार अमित गोरखे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर जन आंदोलन मोर्चा पर्व सुरू ठेविल. मातंग समाज रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. "समाजकार्यासाठी आणि देशा कार्यासाठी लढणे. हा मातंग समाजाला नवीन इतिहास नाही"!.असा इशारा महामोर्चाच्या निमित्ताने देण्यात येत आहे. या महामोर्चात समाजबांधवांची उपस्थितीती लक्षणीय होती . याचा अर्थ महाराष्ट्रातील मातंग समाजाची उपवर्गीकरणासाठी वज्रमूठ झाली आहे.

## सायकल बँक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला मिळणार चालना



■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील वडगाव आनंद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी ‘सायकल बँक’ हा अभिनव उपक्रम सुरू झाला आहे. आळेफाटा येथील उद्योजकांनी उद्योजक डी. बी. वाळुंज यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत शाळेला ११ सायकली भेट दिल्या आहेत. “या उपक्रमांतर्गत विद्यार्थी आता शाळेच्या आवारात शिक्षकांच्या देखरेखीखाली सायकल चालविण्याचे प्रशिक्षण घेणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यायामासह त्यांच्या आरोग्यालाही फायदा होईल,” असा विश्वास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील यांनी व्यक्त केला. या उपक्रमाचे पालक आणि ग्रामस्थांकडून स्वागत होत असून, सायकलींच्या देखभालीची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीने स्वीकारली आहे. यावेळी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, शारीरिक आणि मानसिक विकासाला चालना देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. नियमित सायकल चालवल्यामुळे विद्यार्थ्यांना व्यायामाची सवय लागण्याबरोबरच त्यांची शारीरिक क्षमता, आरोग्य आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाइतकेच त्यांच्या शारीरिक आरोग्यलाही महत्त्व देणे आवश्यक आहे. सायकल बँक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सायकल चालविण्याचे कौशल्य आत्मसात करण्यासोबतच नियमित व्यायामाची संधी मिळणार आहे.

# दारूच्या नशेत निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्यास न्यायालयाकडून दंडाची शिक्षा

### बारामती शहर पोलीस स्टेशनच्या प्रभावी तपास व न्यायालयीन पाठपुराव्याला यश

■ बारामती (दै. संध्या)

बारामती शहर पोलीस स्टेशन येथे दाखल गु.र.नं. 653/2023, भारतीय दंड विधान कलम 279 व मोटार वाहन कायदा, 1988 चे कलम 185 अन्वये दाखल प्रकरणामध्ये मा. न्यायालयाने आरोपी सुनील हिरा सरक, वय 48 वर्षे, रा. डोंबाळवाडी, ता. फलटण, जि. सातारा यास दोषी ठरवून दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणातील घटनेवेळी आरोपी हा त्याच्या ताब्यातील टीव्हीएस स्टार सिटी मोटारसायकल क्र. MH-11-BG-3193 दारूच्या अंमलाखाली, वेडीवाकडी, हयगयीने, अतिवेगाने व रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून चालवीत असल्याचे निदर्शनास आले होते. पोलिसांनी त्यास थांबवून पुढील कायदेशीर कार्यवाही केली. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असता तो दारूच्या अंमलाखाली असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले होते. त्यानंतर उपलब्ध पुरावे व वैद्यकीय कागदपत्रांच्या आधारे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

सदर प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया मा. टी. डी. इंगवले सो., न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बारामती यांच्या न्यायालयात पार पडली. मा. न्यायालयाने प्रकरणातील अभिलेख व कायदेशीर बाबी विचारात घेऊन आरोपीस भारतीय दंड विधान कलम 279 मधील अपराधासाठी रु. 500/- दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, तसेच मोटार वाहन कायदा कलम 185 मधील अपराधासाठी रु. 10,000/- दंड व दंड न भरल्यास 15 दिवस साधी कैद, अशी शिक्षा सुनावली.

दारूच्या अंमलाखाली वाहन चालविणे ही केवळ वाहतूक नियमांची अवहेलना नसून चालकासह रस्त्यावरील इतर निष्पाप नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण करणारी कृती आहे. निष्काळजीपणे व मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कायद्यानुसार ठोस कारवाई करून ती न्यायालयीन शिक्षेपर्यंत नेणे हे सुरक्षित वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकरणांतील प्रभावी कारवाईमुळे वाहतूक नियमांबद्दल आदर निर्माण होण्यास तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांमध्ये कायद्याचा वचक निर्माण होण्यास मदत होते. सदर प्रकरण न्यायालयात प्रभावीपणे चालविण्याच्या प्रक्रियेत महिला पोलीस कॉन्स्टेबल सगुना आवटे, ब.नं. 699 यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रकरणातील साक्षीदारांशी समन्वय साधणे, त्यांना वेळेत न्यायालयात उपस्थित ठेवण्यासाठी पाठपुरावा करणे तसेच न्यायालयीन कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पूर्तता करण्यामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

या प्रकरणात सरकारी वकील ॲड. रणसिंग यांनी प्रभावी कायदेशीर बाजू मांडली. तसेच तपास व न्यायालयीन पाठपुराव्यामध्ये सहाय्यक फौजदार एस. डी. काळे, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी स.पो.नि. माधुरी तावरे, टीएमसी शाखा, पुणे ग्रामीण, कोर्ट पैरवी अधिकारी श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जी. के. कस्पटे व सहाय्यक फौजदार ए. जे. कवडे, टीएमसी शाखा, पुणे ग्रामीण यांनी आवश्यक समन्वय व कायदेशीर सहाय्य केले. सदर प्रकरणात मा. टी. डी. इंगवले सो., न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, बारामती यांनी कायद्यातील तरतुदींनुसार न्यायनिर्णय देऊन शिक्षा सुनावली. तपासापासून न्यायालयीन कार्यवाहीपर्यंत पोलीस अधिकारी, कोर्ट अंमलदार, पैरवी अधिकारी व सरकारी अभियोक्ता यांनी केलेल्या समन्वयपूर्ण प्रयत्नांमुळे प्रकरणाची न्यायालयीन प्रक्रिया परिणामकारकरीत्या पूर्ण झाली.

सदर कामगिरी मा. पोलीस निरीक्षक श्रीशैल्य चिवडशेट्टी, प्रभारी अधिकारी, बारामती शहर पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बारामती शहर पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मद्यप्राशन केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत वाहन चालवू नये. वाहतुकीचे नियम स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी आहेत. दारूच्या अंमलाखाली अथवा निष्काळजीपणे वाहन चालवून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्यांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. “दारू पिऊन वाहन चालवू नका; एका चुकीमुळे स्वतःचे आणि दुसऱ्याचे आयुष्य धोक्यात घालू नका.”

दैनिक संध्या | गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६



# पुणे-नाशिक रेल्वेसह पुणे-लोणावळा लोकल पूर्ववत करा

## खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची मागणी; रेल्वे स्थानकांवरील समस्या सोडवा, अतिक्रमणे हटवा

■ पुणे (दै. संध्या)



पुणे-नाशिक रेल्वे सुरू करण्यासह पुणे-लोणावळा लोकलच्या फेऱ्या पूर्ववत कराव्यात, पुणे रेल्वे स्थानकावरील गर्दी कमी करण्यासाठी हडपसर स्थानकाचा अधिक प्रभावी वापर करावा, तसेच पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणासाठी नव्या रेल्वे सेवा सुरू करण्यात यावी, अशी आग्रही मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी बुधवारी केली. रेल्वे सेवांच्या सक्षमीकरणासाठी बुधवारी पुणे रेल्वे मंडळ कार्यालयात लोकप्रतिनिधी आणि रेल्वे मंडळाचे वरिष्ठ अधिकारी यांची संयुक्त बैठक पार पडली. काही दिवसांपूर्वीच मेधा कुलकर्णी यांनी रेल्वे स्थानक परिसराची पाहणी करून येथील समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले होते.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "पुणे आणि नाशिक या दोन महत्त्वाच्या शहरांना थेट रेल्वेने जोडण्यासाठी पुणे-नाशिक रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी बैठकीत प्राधान्याने मांडण्यात आली. या रेल्वेमुळे पुणे, नाशिक तसेच परिसरातील प्रवाशांना मोठी सुविधा मिळण्याबरोबरच उद्योग, व्यापार, शिक्षण आणि पर्यटनाला चालना मिळेल. पुणे-लोणावळा मार्गावरील लोकलद्वारे विद्यार्थी, नोकरदार आणि अन्य प्रवाशी मोठ्या संख्येने दररोज प्रवास करतात. लोकलच्या फेऱ्या कमी झाल्याने प्रवाशांचा अतिरिक्त ताण येत आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय लक्षात घेऊन लोकल गाड्यांची संख्या पूर्वीप्रमाणे पूर्ववत करावी."

पुणे रेल्वे स्थानकावरील वाढती गर्दी आणि प्रवाशांच्या सुरक्षेचा मुद्दाही बैठकीत प्रामुख्याने मांडण्यात आला. स्थानकावरील प्रवेश व निर्गमन गेटची संख्या गरजेनुसार ठेवावी, प्रत्येक कार्यरत गेटवर आरपीएफ आणि जीआरपीची प्रभावी नियुक्ती करावी, तसेच डीएफएमडी, एचएचएमडी, बॅगेज स्कॅनर आणि सीसीटीव्हीसह अन्य सुरक्षा यंत्रणा पुरेशा प्रमाणात कार्यान्वित कराव्यात. गर्दीच्या काळात अतिरिक्त सुरक्षा मनुष्यबळ आणि स्वतंत्र तपासणी पथक तैनात करावेत, अशी मागणी त्यांनी केली. पुणे रेल्वे स्थानकावरील गर्दीचा ताण कमी करण्यासाठी हडपसर स्थानकाचा अधिक प्रभावी वापर करण्याबाबतही चर्चा झाली. दानापूर एक्स्प्रेस आणि गोरखपूर एक्स्प्रेससारख्या गर्दीच्या गाड्यांच्या पार्श्वभूमीवर हडपसर स्थानकावरून काही गाड्या सुरू करणे किंवा अतिरिक्त डब्यांची व्यवस्था करण्याचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली.

रेल्वे परिसरातील अनधिकृत फेरीवाले, खाद्यविक्रेते आणि अन्य विक्रेत्यांवर नियमित लक्ष ठेवून नियमानुसार कारवाई करावी. अधिकृत विक्रेत्यांकडून विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, किंमत आणि परवान्यांची नियमित तपासणी करावी. नियमभंगासाठी आकारण्यात येणाऱ्या दंडाची प्रक्रिया पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने करावी, अशी मागणी करण्यात आली.

पुणे-हूबळी वंदे भारत एक्स्प्रेसला कराड येथे नियमित थांबा देण्यासह पुणे-बडोदा आणि पुणे-इंदूर मार्गावर नवीन वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. कोल्हापूर-पुणे-दिल्ली-जम्मू-कटरा मार्गावर सुपरफास्ट एक्स्प्रेस सुरू करावी. मुंबई-बेंगळुरू वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेसचा मार्ग पुणे-सातारा-सांगली-मिरज-बेळगाव-धारवाड-हूबळी असा करण्याची मागणी करण्यात आली. यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील महत्त्वाच्या शहरांना जलद रेल्वे जोडणी मिळण्यास मदत होईल, असे बैठकीत नमूद करण्यात आले.

### मराठवाडा, कोकणासाठी रेल्वे जोडणी

नांदेड-हडपसर एक्स्प्रेसचा विस्तार मिरज किंवा कोल्हापूरपर्यंत करण्यासह नांदेड-पुणे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करावी. तसेच नांदेड-पनवेल एक्स्प्रेसचा विस्तार चिपळूण किंवा कोकणातील योग्य स्थानकापर्यंत करावा. मुंबई-पुणे-कुडाळ-पंढरपूर दैनिक एक्स्प्रेस, पुणे-सांगली-पंढरपूर-सोलापूर एक्स्प्रेस सुरू करणे, तसेच नागणसूर रेल्वे स्थानकावर महत्त्वाच्या गाड्यांना थांबा द्यावा. गोदावरी एक्स्प्रेस तसेच नाशिक रोड-भुसावळ एक्स्प्रेस पुन्हा सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली.

"या मागण्या पूर्ण झाल्या, तर प्रवाशांना अधिक जलद आणि सुरक्षित रेल्वे सुविधा मिळण्याबरोबरच संबंधित भागातील पर्यटन, उद्योग, शिक्षण आणि व्यापाराला चालना मिळण्यास मदत होईल. या मागण्यांचा प्रवासी सुविधा आणि प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करावी, तसेच प्रत्येक मागणीवरील कार्यवाहीचा सविस्तर अहवाल उपलब्ध करून द्यावा."

- प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, राज्यसभा खासदार

## थोडक्यात पण महत्वाचे




### तत्त्वांशी कधीही तडजोड न करणाऱ्या अटलजींनी देशाला अणुशक्ती संपन्न बनवले

नवी दिल्ली : दैनिक संध्या

धुळीने भरलेल्या वाऱ्यात झेंडे फडकत होते. राजस्थानमधील निंबाहेडा येथील मैदानावर हजारो डोळे एका दिशेने लागले होते. अचानक शांतता भंगली. पांढऱ्या कापडाने झाकलेली एक भव्य मूर्ती हळूहळू सर्वांसमोर येऊ लागली. तब्बल 21 फूट उंचीची अष्टधातूची मूर्ती होती भारतरत्न आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची. मेवाडच्या वीरभूमीवर उभी असलेली ही मूर्ती जणू काळालाच आव्हान देत होती. राजस्थानमध्ये भारतरत्न आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या पुतळ्याच्या अनावरणाचा हा प्रसंग त्यांच्या महान व्यक्तिमत्त्वाची आठवण करून देणारा ठरला. हे केवळ पुतळ्याचे अनावरण नव्हते, तर सत्ता ही अंतिम ध्येय नसून देशसेवा हेच खरे ध्येय आहे, अशा राजकीय परंपरेचा सन्मान होता. त्याच क्षणी अनेकांच्या मनात पोखरणचा तो ऐतिहासिक दिवस आठवला, जेव्हा तत्त्वांशी कधीही तडजोड न करणाऱ्या अटलजींनी भारताला अणुशक्ती संपन्न देश बनवले. 11 आणि 13 मे 1998 रोजी राजस्थानमधील पोखरण येथे भारताने अणुचाचण्या केल्या. या चाचण्यांचा आवाज संपूर्ण जगाने ऐकला आणि भारत आता आपल्या सुरक्षेबाबतचे निर्णय कोणत्याही बाहेरील दबावाखाली घेणार नाही, हे स्पष्ट झाले. भारतावर आंतरराष्ट्रीय दबाव होता. आर्थिक निर्बंध लादले जाण्याची शक्यताही होती. मात्र अटलजींचा निर्णय स्पष्ट होता — देशहित सर्वांत महत्त्वाचे आहे. हा केवळ अणुचाचण्यांचा निर्णय नव्हता, तर भारताच्या आत्मविश्वासाची आणि स्वाभिमानाची घोषणा होती. अटलजींचे जीवन अनेक भूमिकांनी समृद्ध होते. ते पत्रकार होते. आपल्या लेखणीतून त्यांनी राष्ट्रवादाची भावना मांडली. 'पाञ्चजन्य' आणि 'स्वदेश' यांसारख्या प्रकाशनांच्या माध्यमातून त्यांनी देशभक्तीची भावना जागृत केली. ते कवीही होते. आपल्या शब्दांतून त्यांनी राष्ट्रभक्ती व्यक्त केली. त्यांच्या कविता मनाला स्पर्श करणाऱ्या आणि धैर्य निर्माण करणाऱ्या होत्या. यानंतर ते पंतप्रधान झाले. पंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळतानाही त्यांनी देशाची सुरक्षा आणि चांगले प्रशासन यांना प्राधान्य दिले. पत्रकार, कवी आणि पंतप्रधान अशा प्रत्येक भूमिकेत अटलजींसाठी राष्ट्रहित सर्वांत महत्त्वाचे होते. म्हणूनच त्यांना 'अजातशत्रू' म्हटले गेले. त्यांचा कोणीही शत्रू बनू शकला नाही, कारण त्यांच्या प्रत्येक निर्णयात देश सर्वांत आधी होता.

### एचडीएफसी बँकने फसवणूक जागरूकता अभियान केले सुरू

नवी दिल्ली : दैनिक संध्या




देशाच्या 80व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, एचडीएफसी बँक, भारतातील अग्रगण्य खासगी क्षेत्रातील बँक, यांनी 'विजिल आंटी सेज - लेझिनेस सेव्हज' हा फसवणूक जागरूकता अभियान सुरू केल्याची घोषणा केली आहे. या अभियानाचा उद्देश ग्राहकांना डिजिटल व्यवहार करताना उतावळेपणाने निर्णय घेण्याऐवजी थोडा वेळ थांबण्यास प्रोत्साहित करणे आहे. या अभियानात भारतातील नामांकित स्टँड-अप कॉमेडियन विजिल आंटी सोबत सहभागी झाले आहेत. विजिल आंटी ही बँकेची डिजिटल फसवणूकविषयक सोशल मीडिया इन्फ्लुएंसर असून, या उपक्रमाद्वारे महत्त्वाचा संदेश दिला जात आहे: "फसवणुकीच्या बाबतीत थोडा वेळ थांबणे म्हणजेच बचत करणे". 'विजिल आंटी सेज - लेझिनेस सेव्हज', सात भागांचा कॉमेडी स्पेशल, 15 ऑगस्ट 2026 पासून जिओहॉटस्टारवर विशेषतः स्ट्रीम होणार आहे. या अभियानात सर्व प्रकारच्या डिजिटल फसवणुकीतील एक सामान्य बाब अधोरेखित केली आहे: फसवणूक करणारे लोक नेहमीच घाई निर्माण करतात. बनावट OTP विनंती असो, फिशिंग लिंक असो किंवा डिजिटल अरेस्ट फसवणूक असो त्यांचा उद्देश लोकांना त्वरित प्रतिक्रिया देण्यास भाग पाडणे असतो.

## सोनिया गांधी यांना जनता कधीही माफ करणार नाही : शाह

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

राजस्थानमधील चित्तोडगड जिल्ह्यातील निंबाहेडा येथे रविवारी माजी पंतप्रधान आणि भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या 21 फूट उंच भव्य पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मंचावर उभे राहिले, तेव्हा तेथे फक्त अटलजींच्या आठवणींची चर्चा झाली नाही, तर असा संदेशही दिला गेला, ज्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. भारतीय राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या अमित शाह यांनी यावेळी काँग्रेसच्या त्या विचारसरणीवर टीका केली, ज्यामुळे अनेक दशकांपासून "वंदे मातरम्"ला बाजूला ठेवण्यात आले, असा आरोप त्यांनी केला. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची कल्पना करा. इंग्रजांच्या राजवटीविरोधात संपूर्ण देश रस्त्यावर उतरला होता. हातात तिरंगा आणि ओठांवर एकच घोषणा होती—"वंदे मातरम्!" हे केवळ एक गीत नव्हते, तर गुलामगिरीविरोधात भारताच्या स्वाभिमानाचा आवाज होता. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या लेखणीतून जन्मलेले हे राष्ट्रगीत पुढे स्वातंत्र्य चळवळीच्या जनजागृतीचे प्रतीक बनले. 1896 मध्ये गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात "वंदे मातरम्"चे गायन केले. त्यानंतर क्रांतिकारकांपासून सामान्य नागरिकांपर्यंत सर्वांसाठी ते देशभक्तीचे प्रतीक बनले. हजारो-लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी "वंदे मातरम्"चा जयघोष करत फाशीचा दोर स्वीकारला, गोळ्या झेलल्या, लाठ्यांचा मार सहन केला आणि अनेक वर्षे तुरुंगाच्या अंधाऱ्या कोठड्यांमध्ये घालवली.

## तीन मित्र अनेक मृतदेह एक मुलखावेगळा धंदा

■ प्राईम व्हिडिओतर्फे एमएक्स ओरिजिनल, 8 भागांच्या क्लिन-अप कंपनी'चा ट्रेलर प्रदर्शित

■ मुंबई (दै. संध्या)

एखाद्या मृतदेहापासून सुटका करून देणे हा एखादा व्यवसाय असू शकतो? ओरिजिनल्स इंडियाची भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हिडिओने आज आपल्या आगामी एमएक्स ओरिजिनल, क्लिन-अप कंपनीचा ट्रेलर प्रदर्शित केला. जिओ स्टुडिओचे सादरीकरण आणि GSEAMS Productionची निर्मिती असलेली ही मालिका रोहन घोष यांनी दिग्दर्शित आणि लिहिली असून कोणार्क मुखर्जी यांनी सहलेखन केले आहे. त्यात अमेय वाघ, विशाल जेठवा, अजितेश गुप्ता, जिशू सेनगुप्ता, सास्वता चॅटर्जी आणि रवी किशन यांच्या भूमिका आहेत. राजू, स्वपन आणि गोल्डी हे तीन मित्र आहेत; जे एका अनपेक्षित संधीचे म्हणजे गुंडासाठी मृतदेहांची विल्हेवाट लावण्याचे एका अनपेक्षित व्यवसायात रुपांतर करतात. केवळ स्वतःला गुन्हेगारी जगात त्यांच्या कल्पनेपेक्षाही खोलवर शोधण्यासाठी ते शक्कल लढवतात. ज्योती देशपांडे, कार्तिक निशंदर आणि अर्जुन सिंग बरान निर्मित, क्लिन-अप कंपनी 21 ऑगस्ट 2026 पासून विनामूल्य स्ट्रीम होईल. केवळ प्राईम व्हिडिओवर आणि एमएक्स प्लेयर अँड्रॉइड ॲपवर जी प्राईम व्हिडिओद्वारे एमएक्स प्लेयर या नवीन ओळखीसह रिफ्रेश करण्यात आली आहे. सरिबगंज या कायद्याचा अंमल नसलेल्या सीमावर्ती शहरात टोळीमधील शत्रुत्व आणि राजकीय प्रभाव तेथील लोकांच्या आयुष्याला आकार मिळतो. हा ट्रेलर प्रेक्षकांना त्या जगात खोलवर घेऊन जातो ज्यात तीन मित्र अडकले आहेत. अब्बासने त्यांना खुनाच्या साफसफाईत सामील केल्याने जे सुरू होते, ते लवकरच राजू, स्वपन आणि गोल्डी यांना त्यांच्या परिस्थितीचे त्यांच्या स्वतःच्या 'क्लिन-अप कंपनी'त रूपांतर करण्याची एक असामान्य व्यावसायिक संधी देते. परंतु त्यांचा वाढता उद्योग लवकरच त्यांना सरिबगंजच्या शक्तिशाली गुंडांच्या कचाट्यात अडकवतो, तर दुसरीकडे एक दृढनिश्चयी आयपीएस अधिकारी शहराच्या गुन्हेगारी जाळ्याच्या जवळ येऊ लागतो.





## पीएसपी 'पाण्याच्या बॅटरी'सारखे कसे काम करते?

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

भारताची ऊर्जेची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे देश स्वच्छ आणि परवडणाऱ्या ऊर्जेकडे वाटचाल करत आहे. यासाठी सौर आणि पवन ऊर्जेसारख्या नैसर्गिक स्रोतांपासून वीज निर्मितीचा वाटा वाढवला जात आहे. मात्र, सूर्य दिवसभर उपलब्ध नसतो आणि काही वेळा वाऱ्याचा वेगही कमी होतो. त्यामुळे विजेची मागणी आणि वीज निर्मिती यामध्ये तफावत निर्माण होऊ शकते. या तफावतीमुळे वीजपुरवठ्याची स्थिरता, लवचिकता, विश्वासार्हता आणि सुरक्षितता राखणे आव्हानात्मक ठरू शकते.


ऊर्जा साठवणूक प्रणाली ही मोठ्या प्रमाणावर सौर आणि पवन ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी) हे जीवाश्म इंधनावर आधारित ऊर्जा व्यवस्थेतून बिगर-जीवाश्म इंधनावर आधारित स्वच्छ ऊर्जा व्यवस्थेकडे होणाऱ्या संक्रमणाला मदत करणारे महत्त्वाचे साधन आहेत. पंप्ड स्टोरेज प्रकल्पात वेगवेगळ्या उंचीवर दोन जलाशय असतात. जेव्हा विजेची मागणी कमी असते, तेव्हा ग्रिडमधील अतिरिक्त वीज वापरून खालच्या जलाशयातील पाणी वरच्या जलाशयात पंप करून साठवले जाते. जेव्हा विजेची मागणी वाढते, तेव्हा वरच्या जलाशयातील हेच पाणी टर्बाइनमधून खाली सोडले जाते. पाणी टर्बाइनमधून खाली जाताना वीज निर्मिती केली जाते. अशा प्रकारे, पीएसपी हे पाण्याच्या बॅटरीसारखे काम करते. विजेची गरज कमी असताना ऊर्जा साठवली जाते आणि गरज वाढल्यावर ती पुन्हा वीज निर्मितीसाठी वापरली जाते. पंप्ड स्टोरेज प्रकल्प (पीएसपी) म्हणजे मोठा जलविद्युत निर्मिती प्रकल्प आहे, असा गैरसमज आहे. मात्र पीएसपी हा पारंपरिक जलविद्युत निर्मिती प्रकल्प नसून ऊर्जा साठवणूक प्रकल्प आहे. पीएसपी मध्ये अतिरिक्त वीज निर्मिती होत नाही. त्याऐवजी, उपलब्ध अतिरिक्त वीज वापरून खालच्या जलाशयातील पाणी वरच्या जलाशयात पंप करून साठवले जाते. नंतर विजेची गरज वाढल्यावर हेच पाणी पुन्हा खाली सोडून टर्बाइनद्वारे वीज निर्माण केली जाते. त्यामुळे पीएसपी रासायनिक बॅटरीऐवजी "पाण्याची बॅटरी" म्हणून काम करते.




## पीएनजी ज्वेलर्सकडून पारंपरिक 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा

■ बारामती (दै. संध्या)

भारतीय वैवाहिक परंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक असलेल्या मंगळसूत्राचे सांस्कृतिक महत्त्व जपत, पीएनजी ज्वेलर्सने आपल्या बहुप्रतीक्षित 'मंगळसूत्र महोत्सवा'ची घोषणा केली आहे. हा महोत्सव १३ ऑगस्ट ते १३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत भारतातील सर्व पीएनजी ज्वेलर्स शोरूममध्ये सुरू असणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही भारतीय महिलांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन, परंपरेचा वारसा जपत विविध शैलींतील मंगळसूत्रांचा सर्वाधिक वैविध्यपूर्ण आणि आकर्षक संग्रह ग्राहकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून 'मंगळसूत्र महोत्सव' हा पीएनजी ज्वेलर्सचा एक वैशिष्ट्यपूर्ण वार्षिक उपक्रम म्हणून ओळखला जातो. या महोत्सवात पारंपरिक, आधुनिक तसेच हलक्या वजनाच्या मंगळसूत्रांचा विस्तृत संग्रह उपलब्ध असून, सणासुदीच्या प्रसंगांपासून ते दैनंदिन वापरापर्यंत प्रत्येक गरज पूर्ण करणाऱ्या विविध डिझाइन्स ग्राहकांना पाहायला मिळतील. यंदाच्या संग्रहात आकर्षक सोन्याची मंगळसूत्रे, सॉलिटेअर-प्रेरित डायमंड मंगळसूत्रे, दैनंदिन वापरासाठी उपयुक्त मिनिमलिस्ट डिझाइन्स तसेच व्यक्तिमत्त्वाला अधिक उठाव देणाऱ्या आधुनिक शैलीतील मंगळसूत्रांचा समावेश करण्यात आला आहे.



# अवयव प्रत्यारोपणासाठी ७९८ रुग्णांना १५.७३ कोटींची मदत

■ मुंबई (दै. संध्या)

यकृत, मूत्रपिंड, फुप्फुस, हृदय आदी अवयव निकामी झाल्यानंतर अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया हाच रुग्णांसाठी शेवटचा पर्याय ठरतो. मात्र या उपचारांसाठी येणारा लाखो रुपयांचा खर्च अनेक कुटुंबांसमोर मोठे आर्थिक आव्हान उभे करतो. या अशा परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी राज्यातील गरजू रुग्णांसाठी आधारवड ठरत असून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी 798 रुग्णांना 15 कोटी 79 लाख 66 हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे.




वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे आज अवयव प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रिया अधिक यशस्वी होत आहेत. त्यामुळे किडनी, यकृत, हृदय आणि फुप्फुस निकामी झालेल्या अनेक रुग्णांसाठी उपचाराची नवी आशा निर्माण झाली आहे. मात्र, अशा शस्त्रक्रियांसाठी खाजगी रूग्णालयात लाखो रुपयांचा खर्च येत असल्याने अनेक गरजू रुग्णांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा कठीण परिस्थितीत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी वरदान ठरत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळत असून, त्यांच्या कुटुंबांनाही मोठा दिलासा मिळत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची कार्यपद्धती अधिक गतिमान आणि रुग्णकेंद्रित करण्यात आली आहे. वैद्यकीय मदतीसाठी रुग्णांना मंत्रालयात येण्याची आवश्यकता भासू नये, यासाठी राज्यातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याचबरोबर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्ययावत ऑनलाइन प्रणालीही सुरू करण्यात आली आहे. या नव्या प्रणालीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील रुग्णांना वैद्यकीय मदत अधिक वेगाने उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे, मदतीसाठीचा अर्ज आता रुग्णाऐवजी कक्षाशी संलग्न असलेल्या रुग्णालयामार्फत थेट सादर केला जात आहे. त्यामुळे रुग्णांना स्वतंत्रपणे अर्ज करण्याची आवश्यकता राहिली नाही. सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अर्ज मंजुरीची प्रक्रिया तातडीने पूर्ण होत असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांना गती मिळणार आहे.

अवयव प्रत्यारोपणासारख्या खर्चिक उपचारांसाठी आर्थिक मदत वेळेत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळावी, यासाठी संपूर्ण प्रक्रिया अधिक गतिमान, अद्ययावत करण्यात आली आहे. गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

- श्री. रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत : १५.७९ कोटींची मदत

मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ६१७ रुग्णांना १२ कोटी २३ लाख ६६ हजार रुपयांची मदत देण्यात आली. यकृत प्रत्यारोपणासाठी १६२ रुग्णांना ३ कोटी २१ लाख ५० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. फुप्फुस प्रत्यारोपणासाठी ०३ रूग्णांना ६ लाख रूपयांची मदत देण्यात आली. तर, हृदय प्रत्यारोपणासाठी १६ रुग्णांना २८ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर उपचारांसाठी लागणारा वेळ कमी करणे, अर्ज प्रक्रियेतील अडथळे दूर करून गरजू रुग्णांना तातडीने मदत मिळणे सोयीचे झाले आहे.



दैनिक संध्या

गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews





## थोडक्यात पण महत्वाचे



### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**नारायणगाव : दैनिक संध्या**

पिंपरी पेंढार येथील श्रीरंगदास स्वामी शिक्षण विकास मंडळ, आळे संचलित श्री सद्गुरु सिताराम महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात एक विशेष सोहळा पार पडला.इयत्ता पाचवी ते बारावीच्या वर्गांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा, तसेच पाचवी शिष्यवृत्ती मंथन परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी एका भव्य गौरव व बक्षीस वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला."विद्यार्थ्यांनी आयुष्यात सतत मेहनत आणि चिकाटी बाळगावी. याच जोरावर त्यांनी आपले भविष्य उज्ज्वल करावे आणि उत्तुंग यश संपादन करावे," असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याला प्रामुख्याने माजी आमदार अतुल बेनके, पंचायत समिती सदस्य जयसिंग पोटे, जिल्हा परिषद सदस्य मंगेश काकडे ,विघ्नहर साखर कारखान्याचे संचालक रामदास वेठेकर, सरपंच सुरेखाताई वेठेकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब शिंदे होते. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली. याप्रसंगी मच्छिंद्र लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले, तर युवराज डहाळे यांनी प्रास्ताविक मांडून उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर बाबू कुटे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. समीर वेठेकर व भालेराव मॅडम यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

### जुन्नरच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत रहिमतपूरचा मिथुन माने प्रथम

**जुन्नर : दैनिक संध्या**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त जुन्नर नगर वाचनालय आणि स्वराज्य मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ३८व्या भव्य राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत खुल्या गटात सातारा जिल्ह्यातील रहिमतपूर येथील मिथुन दत्तात्रय माने याने प्रथम क्रमांक पटकावत सर्वोत्कृष्ट वक्त्याचा बहुमान मिळविला. जुन्नर येथे आयोजित या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सात विविध गटांमध्ये तब्बल ३८० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. विविध वयोगटांतील स्पर्धकांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमास मुख्याधिकारी डॉ. चरण कोल्हे, नगराध्यक्षा सुजाता काजळे, स्वराज्य मित्र मंडळाचे अध्यक्ष गोविंद हिंगे, उपाध्यक्ष पोपट टेमगीरे, रमेश खरमाळे, राहुल लव्हांडे, सुरेश परदेशी, भिमा भंजोड, गणेश सोनवणे, वसंत सरोगदे, अमोल तळपे, प्रमोद लांडे, दीपक थकवे, विनोद परदेशी, राहुल पिंपळे यांच्यासह परीक्षक व स्पर्धक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वराज्य मित्र मंडळाचे संस्थापक मधुकर काजळे यांनी केले. सूत्रसंचालन मेघनाथ जाधव यांनी केले, तर आभार ॲड. प्रेरणा काजळे यांनी मानले. स्पर्धेच्या खुल्या गटात मिथुन दत्तात्रय माने याने प्रथम, प्रांजल प्रेमनाथ तनपुरे हिने द्वितीय तर अनुष्का रामभाऊ वाळे हिने तृतीय क्रमांक पटकाविला. इयत्ता ११वी-१२वी गटात सई नितीन ससाणे हिने प्रथम, प्राची संदिप पवार हिने द्वितीय तर मंजिरी किशोर महामुनी हिने तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता ८वी ते १०वी गटात आदिती दिलीप भारमळ प्रथम, श्रीकला नवनाथ खेबडे द्वितीय तर शिवांजली रामचंद्र भोईर तृतीय ठरल्या. इयत्ता ५वी ते ७वी गटात आर्या स्वप्नील वाळुंज हिने प्रथम, रितीका संदिप मलघे हिने द्वितीय तर स्वरा संतोष मुळे हिने तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता ३री ते ४थी गटात कृष्णा मंगेश कुंभार प्रथम, नमन विवेक शेटे द्वितीय तर मान्या शैलेश काळे तृतीय ठरली. इयत्ता १ली ते २री गटात अधिरा स्वप्नील बोऱ्हाडे हिने प्रथम, उत्कर्ष सुखदेव असुर्ले याने द्वितीय तर अभिनव तानाजी बोऱ्हाडे याने तृतीय क्रमांक मिळविला. ज्युनियर केजी व सिनियर केजी गटात निधीशा उदय नांगरे हिने प्रथम, ओजस्वी उत्तम महाले हिने द्वितीय, ऋग्वेद रवींद्र मांडे याने तृतीय, प्रांशी अजय गाडेकर हिने चतुर्थ तर आलोक वैभव भिसे याने पाचवा क्रमांक पटकाविला. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांना व वक्त्यांना आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे उपस्थितांनी कौतुक केले.

### मलठणमध्ये २२ लाखांचा मॅफेड्रॉन जप्त

**कवठे येमाई : दैनिक संध्या**



शिरूर तालुक्यातील मलठण येथील राजावाडा चौकात पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व शिरूर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत १०८.५ ग्रॅम मॅफेड्रॉन (एमडी) जप्त केले. आंतरराष्ट्रीय बाजारभावानुसार या अमली पदार्थाची किंमत सुमारे २१ लाख ७० हजार रुपये असून, मोटारसायकलीसह सुमारे २२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत सुरेंद्रसिंह भैलूसिंह राठोड ऊर्फ राजपूत (२४) व श्रवण तेजाराम बिश्नोई (३१), दोघे रा. मलठण, मूळ राजस्थान यांना अटक करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे मंगळवारी (१८ ऑगस्ट) मध्यरात्री सापळा रचून पोलिसांनी ही कारवाई केली.पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कारवाईमुळे ग्रामीण भागातील अमली पदार्थांच्या जाळ्याला मोठा धक्का बसला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन केनेकर करीत आहेत.

### मूर्ती पाहण्यासाठी भाविकांची गर्दी

**कवठे येमाई : दैनिक संध्या**




(ता. बारामती) येथे श्रियाळ षष्ठीनिमित्त ग्रामस्थांनी श्रियाळशेठची आकर्षक मूर्ती तयार केली होती. पारंपरिक पद्धतीने साकारलेल्या या मूर्तीला विविध रंगांनी सजविण्यात आले असून, उत्सवानिमित्त परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. मूर्ती पाहण्यासाठी भाविकांची गर्दी झाली होती. चार पिढ्यांपासून श्रीयाळ षष्ठी साजरी करण्यात येते.श्रीयाळ राजाची मूर्ती तयार करत असल्याचे श्रीयाळ मित्र मंडळाच्या सदस्यांनी सांगितले. यावेळी विविध समाजाच्या वतीने सहा सक्रोबा तयार करण्यात येतात. यशवंतराव मंदिर, जानुबाई मंदिर यांच्यावतीने अब्दागिरी ,छत्री, झांज, ढोल, ताशांच्या गजरामध्ये श्रीयाळ राजाची आरती करून मिरवणूक काढण्यात येते. विठ्ठल मंदिर येथे फुगड्यांचा फेर धरून आनंदाने महिलावर्ग फुगड्या खेळत असतात. यावेळी महिलांची हजेरी मोठ्या प्रमाणात असते.

## पुणे जिल्हास्तरीय एक दिवसीय क्रीडा कार्यशाळा उत्साहात संपन्न

■ जेजुरी (दै. संध्या)



पुणे जिल्हा परिषद शिक्षण विभाग, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघ व महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे जिल्हास्तरीय एक दिवसीय क्रीडा कार्यशाळा बुधवार, दिनांक १९ ऑगस्ट २०२६ रोजी आचार्य अत्रे सांस्कृतिक सभागृह सासवड येथे उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य माननीय नंदकुमार सागर सर यांनी उपस्थितांचे स्वागत करून क्रीडा शिक्षणाचे महत्त्व, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील शारीरिक शिक्षणाची भूमिका तसेच शालेय स्तरावर क्रीडा संस्कृती रुजविण्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे जिल्हा माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, गुरुकुल करिअर अकॅडमी सासवडचे संस्थापक अध्यक्ष व रोटरी क्लबचे अध्यक्ष संदीप टिळेकर,पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष व सेकंडरी बँकेचे उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, प्रा. डॉ. महेश देशपांडे, पुरंदर व बारामती तालुका क्रीडा अधिकारी महेश चावले, प्रा. डॉ. शरद आहेर, आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स कोच सुनील शिवले, दुर्योधन जठार, अशोक देवकर, दत्तात्रय रोकडे,रामदास रेटवडे, जालिंदर आवारी, प्रल्हाद करकर, सचिन दुर्गाडे यांच्यासह शिक्षण व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळेत क्रीडा शिक्षकांना विविध क्रीडा प्रकारांबाबत मार्गदर्शन, आधुनिक प्रशिक्षण पद्धती, क्रीडा कौशल्यांचा विकास तसेच विद्यार्थ्यांमध्ये क्रीडागुण विकसित करण्यासाठी आवश्यक बाबींची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय क्रीडा शिक्षण अधिक प्रभावी करण्यावर यावेळी भर देण्यात आला. कार्यक्रमास पुणे जिल्ह्यातील मुख्याध्यापक व क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेमुळे क्रीडा शिक्षकांना नवीन माहिती, आधुनिक प्रशिक्षण पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमाचे नियोजन पुरंदर तालुका क्रीडा संघटनेचे निलेश जगताप, प्रल्हाद कारकर, सोमनाथ उबाळे, रोहिणी गायकवाड, तानाजी झेंडे, प्रवीण तांदळे, सचिन दुर्गाडे, संजय जैनक, बाळासाहेब झेंडे, हेमंत जगताप, प्रल्हाद गिरमे, गणेश कोलते, रणजित चव्हाण, दिलीप जगताप,बाबुराव गायकवाड,राजाराम पिसाळ, श्वेतांबर बेलसरे यांनी केले. सूत्रसंचालन किशोर दरेकर यांनी केले. आभार महादेव मानवांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुणे जिल्हा क्रीडा शिक्षक संघ, पुरंदर तालुका क्रीडा शिक्षक संघ व संबंधित पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## रक्तदान शिबिरात तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ चाकण (दै. संध्या)

रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी रक्तदान शिबिरांची नितांत गरज आहे. ही गरज ओळखून चाकण येथे जय श्री जगन्नाथ सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तरुणांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. जगन्नाथ सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष देबाशिष प्रधान व सचिव रवींद्रनाथ कर यांच्या हस्ते शिबिराचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष तन्मय खटई, उपसचिव सुब्रत दास, राजेश सेनापती, आलोक मिश्रा, सुमन सेनापती, सुब्रजित सारब, कैवल्य मोहंती, संतोष मुनी, दिप्ती रंजन घोरान, जितेंद्र एपीली, सुशांत बेहेरा, राकेश बेहेरा, मुना पात्र, सौम्या बेहेरा, सत्यव्रत गिरी, तपश बेहेरा, सुनील बेहेरा, अनिल मिसर, लक्ष्मण जाधव, अशोक पांडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे म्हणाले," श्री जगन्नाथ सेवा प्रतिष्ठानचे कामकाज कौतुकास्पद आहे. या प्रतिष्ठानला भविष्यकाळात लागणारे सर्व सहकार्य निश्चितपणे केले जाईल. रक्तदान शिबिर घेऊन या प्रतिष्ठानने समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. रक्ताचा तुटवडा भासू नये यासाठी रक्तदान शिबिरांची नितांत गरज आहे. अशा शिबिरांमध्ये तरुणींसह तरुणांचा सहभाग निश्चितपणे असायला हवा." संजीवनी रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात १६७ बाटल्यांचे संकलन करण्यात आले. रक्तदात्यांचा यावेळी शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन नगरसेवक सागर बनकर, गुलाब शेवकरी, लक्ष्मण जाधव, अशोक पांडे, अनिल मिसर आदींच्या हस्ते सन्मान करण्यात आला. देबाशिष प्रधान व रवींद्रनाथ कर यांनी स्वागत केले. सुशांत बेहेरा यांनी सर्वांचे आभार मानले.

## जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्था राज्यातील आदर्श पतसंस्था : आमदार शरददादा सोनवणे

■ नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील 103 वर्षांची यशस्वी परंपरा लाभलेल्या जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेस आर्थिक वर्ष 2025/26 मध्ये 3 कोटी 78 लक्ष 10 हजार रुपये इतका उच्चांकी नफा झाल्याची माहिती संस्थेचे सभापती सचिन मुळे यांनी दिली.

पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नारायणगाव ता.जुन्नर येथे निलायम गार्डन मंगल कार्यालयात संपन्न झाली.या सभेमध्ये संस्था व सभासद हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.सर्वसाधारण कर्ज मर्यादा 40 लक्ष रुपये,सभासद मृत्यू मदत निधी 35 लक्ष रुपये,आकस्मिक कर्ज 1 लक्ष रुपये,वैद्यकीय मदत निधी 75 हजार रुपये यासारखे ठराव मंजूर करण्यात आले.

संस्था स्वभांडवलावर व्यवसाय करत असून 8.60 % दराने कर्ज वाटप करत असून 8.40% दराने मुदत ठेवी स्वीकारत आहे. संस्थेचे वसूल भाग भांडवल 40 कोटी रुपये असून सभासद संख्या 1082 आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पहिल्या सत्रात केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक पदी पदोन्नती झालेल्या शिक्षकांचा तसेच शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक शिक्षक,इस्रो-नासासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक,विविध पुरस्कार मिळवणाऱ्या शिक्षकांचा,विविध पुरस्कार प्राप्त शाळांचा तसेच सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी जुन्नर तालुक्याचे आमदार शरददादा सोनवणे, जि.प.सदस्य गुलाबशेठ पारखे, माईताई लांडे,पंचायत समिती सभापती कमलताई शेळकंदे, उपसभापती अमित ढोले, पं.स.सदस्य संभाजीशेठ चव्हाण, जयश्रीताई बनकर, सुषमाताई वाव्हळ, संजयशेठ वऱ्हाडी, जुन्नर शहर नगराध्यक्षा सुजाताताई काजळे, मधुकर काजळे, शिक्षक संघटनांचे पदाधिकारी राज्य संपर्कप्रमुख मंगेश मेहेर, जिल्हा सरचिटणीस खंडेराव ढोबळे, विकास मटाले, भरत बोचरे, रामदास संभेराव, तालुका अध्यक्ष वैभव सदाकाळ, रमाकांत कवडे, उपेंद्र डुंबरे, सत्यवान मस्के, केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे, वैशाली कुऱ्हाडे, राजश्री डोंगरे, नयना आर्वीकर, सुरेखा बटवाल, व पूनम जाधव आदि मान्यवर पदाधिकारी व सभासद शिक्षक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभासदांबरोबरच त्याच्या कुटुंबाची काळजी घेणारी ही पतसंस्था नक्कीच इतर पतसंस्थांसाठी आदर्श पतसंस्था असल्याचे मत आमदार शरददादा सोनवणे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक संतोष पाडेकर, सुनीता वामन,अनिल कुटे,सचिव जितेंद्र मोरे यांनी केले तर नियोजन उपसभापती सविता कुऱ्हाडे, खजिनदार सुभाष दाते, विजय लोखंडे रवींद्र वाजगे, अंबादास वामन, नानाभाऊ कणसे, दिलीप लोहकरे, अविनाश शिंगोटे, पुनम तांबे, दत्तात्रय घोडे, ज्ञानदेव गवारी, सहचिटणीस दत्तात्रय हांडे यांनी केले. आभार संस्थेचे सरचिटणीस उमेश शिंदे यांनी मानले.

## वाघेश्वर मंदिर परिसरात बेलाचे वृक्षारोपण



■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

वाघोलीचे नंदनवण असलेल्या वाघेश्वर मंदिर परिसरात महादेवाला आवडणारे पवित्र असे बेलाचे वृक्ष नव्हते ही अनेक दिवसांची खंत मनात ठेवत या श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारचे अवचित्य साधून वाघेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा वाघोलीचे माजी उपसरपंच राजेंद्र सातव पाटील यांच्या वतीने १२ ते १३ फूट उंचीच्या पवित्र अशा बेलाचे शास्त्रीय पद्धतीने वृक्षारोपण विशेषत:हा महिला भगिनींच्या हस्ते पार पडले. बेलाच्या वृक्षारोपणाचा मान महिलांना देण्यात आल्याचे वाघोलीच्या माजी सरपंच जयश्री सातव पाटील यांनी सांगितले. हे बेलाचे वृक्षारोपण नगरसेवक डॉ.श्रेयसी प्रितम खांदवे,नगरसेवक येश्वर्या सुरेंद्र पठारे, वाघोलीच्या माजी सरपंच जयश्री राजेंद्र सातव पाटील आदी महिला मान्यवरांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी मा.उपसरपंच राजेंद्र सातव पाटील, पूजा नवनाथ पठारे, माजी उपसरपंच मालती गोगावले, माजी ग्रामपंचायत सदस्य नंदा मोरे, राष्ट्रवादी महिला काँग्रेस उपाध्यक्षा मोनिका सातव, प्रियंका रामकृष्ण सातव, सोनाली अनिल सातव, शिवसेना महिला आघाडीच्या पुणे शहराच्या नेत्या अमृत पठारे, श्वेता जाधव, पोलीस स्टेशन दक्षता कमिटीच्या सदस्या छाया बहिरट, अर्चना शिरसाठ, वैशाली बहिरट, संध्या शिंदे, वाघोलीचे सामाजिक कार्यकर्ते अतुल शिंदे, आदी महिला पदाधिकारी,नागरिक व शंभू महादेवाचे भक्त उपस्थित होते. उपस्थित प्रमुख माता भगिनींना सन्मान पार पडला.




## विजयकुमार हरिश्चंदे यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार

■ जेजुरी (दै. संध्या)

पत्रकारिता, छायाचित्रकार, मराठी चित्रपट आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल जेजुरी येथील विजय कुमार हरिश्चंदे यांना जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने आदर्श पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात नगराध्यक्ष जयदीप बारभाई,उपनगराध्यक्ष गणेश निकुडे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. विजयकुमार हरिश्चंदे हे गेली 25 वर्षे पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. एक उत्कृष्ट छायाचित्रकार म्हणून त्यांचे नावलौकिक आहे. तसेच त्यांनी अनेक मराठी चित्रपटा मध्ये कलावंत म्हणून काम केले आहे. सामाजिक, कला क्रीडा, सांस्कृतिक , धार्मिक ऐतिहासिक विषयावर त्यांनी लिखाण केले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना अनेक संस्थानी पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.

## शिवनेरी रस्त्यावर भीषण अपघात; एकाचा मृत्यू, दोघे गंभीर

■ नारायणगाव (दै. संध्या)




शिवनेरी गडाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खिंडीत एक अत्यंत भीषण अपघाताची घटना घडली आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या एका ट्रॅक्टर-ट्रॉलीने दुचाकीला जोरदार धडक दिली. या दुर्दैवी अपघातात एका युवकाचा मृत्यू झाला असून, अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. दीपेश विश्वकर्मा, पवन ठाकपुरी आणि शैलेश विश्वकर्मा हे तिघे मित्र एकाच दुचाकीवरून जुन्नरच्या दिशेने प्रवास करत होते. शिवनेरी रस्त्यावरील खिंडीतून जात असताना, समोरून येणाऱ्या वेगवान ट्रॅक्टर-ट्रॉलीने त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की तिघेही रस्त्यावर पडले आणि त्यांना गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान दीपेश विश्वकर्मा रा. बनकर फाटा, जुन्नर या तरुणाचा मृत्यू झाला. पवन ठाकपुरी रा. कल्याण पेठ, जुन्नर आणि शैलेश विश्वकर्मा रा. नेहरकर वस्ती, जुन्नर यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणी पोलिसांनी ट्रॅक्टर चालक राजू युवराज कोंडे रा. धामणखेल, जुन्नर याच्या विरोधात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताबाबत मृत दीपेशचे नातेवाईक शंकर विश्वकर्मा यांनी पोलिसात फिर्याद दिली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पत्रकारांचा धमकीच्या निषेधार्थ भव्य मोर्चा

■ नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर शहरात सोमवारी पत्रकारांच्या एकजुटीचा एल्गार पाहायला मिळाला. ज्येष्ठ पत्रकार सुरेश वाणी यांना आमदार शरद सोनवणे यांनी जाहीर कार्यक्रमात धमकी दिली. या घटनेच्या निषेधार्थ जुन्नर, आंबेगाव, खेड आणि शिरूर तालुक्यांतील पत्रकार एकवटले आणि जुन्नर शहरातून भव्य मोर्चा काढण्यात आला.

मोर्चामध्ये पत्रकारांनी जोरदार घोषणाबाजी करत आमदार शरद सोनवणे यांच्या धमकीच्या वक्तव्याचा आणि पत्रकारांवर दबाव आणण्याच्या प्रवृत्तीचा तीव्र निषेध केला.जुन्नर शहरातून निघालेला हा मोर्चा थेट जुन्नर तहसील कार्यालयावर धडकला. विविध माध्यमांचे पत्रकार मोठ्या संख्येने या मोर्चामध्ये सहभागी झाले होते. पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीरपणे घ्यावा, पत्रकारांना धमकी देणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी आणि या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.

जमलेल्या पत्रकारांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल्ल, जुन्नर तहसीलदार रणजित भोसले, जुन्नर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय गुंड तसेच प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया आदींकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनामध्ये घटनेची निष्पक्ष चौकशी करून पत्रकार सुरेश वाणी यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्याची आणि चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. मोर्चानंतर तहसील कार्यालयाच्या परिसरात पत्रकारांची सभा झाली. ज्येष्ठ पत्रकार डी. के. वळसे, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अतुल परदेशी, विघ्नहर टाइम्सचे संपादक आणि ज्येष्ठ पत्रकार सुरेश वाणी, महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाचे अध्यक्ष डॉ. समीर राजे, संपादक विकास कडलग, शिवाई न्यूजचे संपादक संदीप उत्तरडे, सकाळचे अशोक खरात आणि समर्थ भारतच्या संपादिका स्नेहा बारवे यांनी उपस्थित पत्रकारांना संबोधित केले.यावेळी पत्रकाराला धमकी देणे म्हणजे लोकशाहीवरील हल्ला असल्याची भूमिका वक्त्यांनी मांडली.

पत्रकार आणि लोकप्रतिनिधींमध्ये मतभेद होऊ शकतात. मात्र पत्रकाराला धमकी, दबाव किंवा दहशतीच्या माध्यमातून गप्प करण्याचा प्रयत्न हा लोकशाहीसाठी गंभीर विषय असल्याचे यावेळी सांगण्यात आले.पत्रकारांच्या निवेदनानुसार, अंजनावले येथील बैठकीदरम्यान ज्येष्ठ पत्रकार सुरेश वाणी यांना आमदार शरद सोनवणे यांनी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.